# पोलिसांची लाचखोरी म्हणजे खाकी वर्दीतील लूटमार व जनतेचा विश्वासघात

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २३.०७.२०२५ | अंक नं. ९७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डद्वारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर + 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
उद्या
गुरूपुष्यामृतयोग
शुभमुहूर्त सुवर्णखरेदीचा..
वेढणी व क्वाईनच्या रूपानं शुध्द सोनं खरेदी करा.
0.5gm / 1gm / 2gm / 5gm / 10gm / 15gm / 20gm / 25gm / 50gm
99.50 शुध्दतेमधील प्रत्येक वजनामध्ये वेढणी व क्वाईन उपलब्ध.
सोन्या-चांदीच्या आकर्षक पॅकिंगमधील राख्या उपलब्ध.
चांदीची राखी ₹151/- पासुन
सोन्याची राखी ₹799/- पासुन
Conditions Apply*

## 'खा की' एवढाच त्यांचा मूलमंत्र, म्हणजे आम्ही खातो अन् तुम्हीही खा

### लाचखोरीबाबत मुळाशी जावून तपास करून कायद्याच्या भक्षकांचा बंदोबस्त करावा

नगर – अहिल्यानगर जिल्हा पोलिस दलातील उघडकीस आलेली पोलिसांची लाचखोरी म्हणजे खाकी वर्दीतील लूटमार व जनतेचा विश्वासघात असून, पोलीस दलातील लाचखोर पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांचे 'ग्रो मोअर' हे तर ब्रीदवाक्य झालेले असल्याने या लाचखोरीबाबत मुळाशी जावून तपास करून कायद्याच्या भक्षकांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, नुकतेच अहिल्यानगर जिल्ह्यातील पोलिसांच्या लाचखोरीचा प्रकार उघडकिस आला आहे. हा प्रकार म्हणजे खाकी वर्दीतील लोकांनी केलेली लुटमार व सामान्य जनतेच्या विश्वासावर आघात करणारा आहे. लाच स्वीकारणारे पोलीस हे कायद्याचे रक्षक न राहता कायद्याचे भक्षक होतात, असे पोलीस समाजाच्या मूलभूत सुरक्षिततेला धोक्यात घालतात. त्याचा समाज, प्रशासन व न्यायव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होत आहेत. गेल्या काही वर्षातील जिल्ह्यातील कायदा, सुव्यवस्था ढासळण्याचे हे एक कारण आहे. जेव्हा पोलीस अधिकारी लाच घेतात, तेव्हा सामान्य माणसाचा विश्वासच उद्ध्वस्त होतो. अशा अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई न झाल्यास कायदा सुव्यवस्था खिळखिळी होते.

काही पोलीस अधिकारी व कर्मचारी विविध कारणांनी, जसे की एफआयआर नोंदवण्याच्या बदल्यात, गुन्हे नोंदवू नयेत व अटक करू नये म्हणून, परवानगी मिळवून देणे, गुन्ह्याचा तपास हवा तसा करण्यासाठी, कोर्टात योग्य रिपोर्ट दाखल करण्यासाठी, तपास किंवा पंचनाम्याचा अहवाल बदलून देण्यासाठी, ट्रक, वाहन सोडण्यासाठी लाचेची मागणी करत असल्याच्या तक्रारी येत असतात. परंतु त्या पलीकडे जावून थेट आरोपींशी हातमिळवणीचे प्रकार जिल्ह्यात पहावयास मिळाले आहे, याचे हे एक अलीकडचे उदाहरण आहे. 'ग्रो मोअर' प्रकरणातून पोलीस खात्यातील काही भ्रष्ट पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांचे 'ग्रो मोअर' हे तर ब्रीदवाक्य झालेले आहे. गुन्ह्यातील अर्थकारणावर त्याचा तपास कोणी व कितपर्यंत करायचा, हे ठरवले जाते. यात कलंकित पोलीस मग ते कनिष्ठ कर्मचारी असले तरी त्यांच्या भूमिकेस महत्व आहे. 'खा की' एवढाच त्यांचा मूलमंत्र आहे. म्हणजे 'आम्हीही खातो अन् तुम्हीही खा'. दुर्दैव असे आहे, की सध्या या प्रकरणामुळे समोर आलेले अधिकारी आणि कर्मचारी हे एलसीबीचे आहेत. आता एलसीबी म्हणजे 'लोकल क्राइम ब्रांच' कि 'लोकल कलेक्शन ब्रांच' यापैकी नागरिकांनी काय समजावे.

विशेष म्हणजे ज्या 'ग्रो मोअर' मुळे नागरिकांची मोठी फसवणूक झाली, त्यात लक्ष घालून फसविले गेलेल्या नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार सुजय विखे पाटील प्रयत्नशील आहेत, त्याच प्रकरणात पोलिसांनी 'डल्ला' मारावा, हे नक्कीच धाडसाचे आहे, परंतु त्यामागे त्यांना आलेला आत्मविश्वास नेमका कशामुळे आला आहे, हे पाहणेही महत्वाचे ठरणार आहे.

न्यायालयाने वेळोवेळी पोलीस खात्यातील लाचखोरीविरोधात कठोर शब्दात टीका केली आहे आणि यास लोकशाहीवरील घातक धक्का मानले आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्याचा पदभार स्वीकारला आहे. पूर्वीचे पोलीस अधीक्षक यांच्या काळात जिल्ह्यातील पोलीस दलातील लाचखोरीचे अनेक किस्से आहेत. नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांनी याविरुद्ध उपोषणहीही केले होते, त्याचे पुढे काय परिणाम झाले याबाबत जनता अनभिज्ञ आहे. पोलीस खात्यातील लाचखोरीविरोधात कारवाई न करणारे पोलीस अधिकारी हे एक गंभीर सामाजिक आणि प्रशासकीय संकट आहे. जेव्हा पोलीस अधिकारी स्वतः लाचखोर असतात किंवा लाच घेणाऱ्या सहकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यास टाळाटाळ करतात, तेव्हा संपूर्ण यंत्रणेत भ्रष्टाचार मूळापासून पसरतो. यामुळे न्याय, सुरक्षा आणि जनतेचा विश्वास उद्ध्वस्त होतो. हे यापूर्वीच्या अधिकाऱ्यांच्या काळात जिल्ह्याने अनुभवले आहे. पूर्वीची या खात्यातील घाण साफ करण्याची वेळ आली आहे.

पोलीस खात्यातील लाचखोरीविरुद्ध कठोर कारवाई करणारे काही प्रामाणिक व धाडसी पोलिस अधिकारी विष्णू वसंतराव काळे, विक्रांत देशमुख, दत्ता पाडसलगीकर असे व इतर महाराष्ट्रात उदयास आले आहेत. या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार करणाऱ्या सहकाऱ्यांवर कारवाई करून प्रशासनात एक आदर्श निर्माण केला आहे. भ्रष्टाचार सहन केला तर तो प्रोत्साहनच ठरतो. लाचखोर पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करूनच नागरिकांचा विश्वास पुन्हा जिंकता येतो. त्यामुळे पोलिस अधीक्षकांनी अहिल्यानगर पोलीस दलातील लाचखोर पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या लाचखोरीबाबत मुळाशी जावून तपास करून कायद्याच्या भक्षकांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी अ‍ॅड. श्याम आसावा यांनी निवेदनाद्वारे पोलिस अधीक्षकांकडे केली आहे. या निवेदनाची प्रत नाशिक परिक्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनाही पाठविली आहे.

## नगरच्या लष्करी जवानाचा कोलकत्त्याजवळ रेल्वे मार्गाशेजारी आढळला मृतदेह

### सुट्टीसाठी गावी निघाल्यावर १५ जुलैपासून तुटला होता संपर्क, आठव्या दिवशी लागला शोध

नगर – सुट्टीसाठी गावी निघालेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील लष्करी जवानाचा मृतदेह कोलकत्त्याजवळ खडकपूर परिसरात रेल्वे मार्गाशेजारी आढळून आला आहे. ज्ञानदेव सुखदेव अंभोरे (वय ३७, रा. घुटेवाडी, ता. श्रीगोंदा) असे या जवानाचे नाव आहे. ते १५ जुलै रोजी रात्री नगरकडे येण्यासाठी निघाले होते. त्यानंतर त्यांचा संपर्क तुटला होता. थेट आठव्या दिवशी २२ जुलैला सायंकाळी त्यांचा मृतदेह आढळून आला आहे. हा अपघात आहे की, घातपात याचा शोध सैन्यदलाचे पथक व पश्चिम बंगाल पोलिस घेत आहेत.



ज्ञानदेव अंभोरे (मयत)

जवान ज्ञानदेव अंभोरे हे कोलकत्ता येथील लष्करी तळावर पायोनियर आर्मी युनिट १८०३ मध्ये हवालदार या पदावर नियुक्तीस होते. ते सन २००४ मध्ये सैन्य दलात भरती झालेले होते. त्यांनी जवळपास २१ वर्षे सैन्यदलात सेवा केलेली आहे व येत्या एक दोन वर्षात ते निवृत्त होणार होते. १५ जुलै रोजी ते काही दिवसांची सुट्टी घेवून गावी येण्यास निघाले होते. त्यावेळी रात्री ९.१५ ते ९.३० या दरम्यान त्यांनी पत्नीला कॉल करून आपण हावडा रेल्वे स्टेशनवर असून गावी येण्यासाठी निघालो असल्याचे सांगितले. त्यानंतर १६ जुलैला त्यांच्या पत्नीने त्यांना मोबाईलवर संपर्क केला, मात्र त्यांनी दिवसभर फोन उचलला नाही. १७ जुलैला फोन बंद लागला.

अनेकदा फोन करूनही संपर्क न झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी कोलकत्ता येथील त्यांच्या युनिटच्या कार्यालयात फोन करून माहिती दिली. सैन्य दलाच्या जवानांनी त्यांचा शोध सुरु करत कुटुंबियांना कोलकत्त्याला बोलावून घेतले. त्यानंतर नगर हून त्यांचे बंधू व इतर नातेवाईक कोलकत्त्याला गेले. तेथे स्थानिक पोलिस, रेल्वे पोलिस आणि सैन्य दलाच्या जवानांनी शोध मोहीम राबविली. या कालावधीत त्या परिसरात झालेल्या रेल्वे अपघातातील बेवारस मृतदेह कुटुंबियांना दाखविण्यात आले. त्यातील कोलकत्त्याच्या पुढे खडकपूर परिसरात १६ जुलै रोजी सकाळी आढळून आलेला मृतदेह ज्ञानदेव अंभोरे यांचाच असल्याचे २२ जुलै रोजी सायंकाळी निदर्शनास आले.

त्यानंतर तेथील सायबर पोलिसांनी अंभोरे यांच्या मोबाईलचे शेवटचे लोकेशन तपासले असता ते महाराष्ट्रात आढळून आले. तसेच पुणे रेल्वेस्थानकात हावडा ते पुणे आलेल्या आझाद हिंद एक्सप्रेस मध्ये एक बॅग बेवारस अवस्थेत आढळून आली. ती बॅग मयत जवान अंभोरे यांचीच असल्याचे समोर आले. मात्र त्यांच्या जवळ असलेली दुसरी बॅग ज्यात त्यांचे ओळखपत्र व इतर कागदपत्रे होते. ती कोठेही आढळून आलेली नाही. मयत अंभोरे यांचा रेल्वेगाडीतून पडून अपघात झाला की, लुटीच्या उद्देशाने त्यांना कोणी रेल्वे गाडीतून खाली ढकलले याचा शोध सैन्यदलाचे पथक व पश्चिम बंगाल पोलिस घेत आहेत.

मयत जवान अंभोरे यांच्या पश्चात पत्नी, २ मुली, १ मुलगा, आई, सैन्यदलात असलेला भाऊ, भावजय, ३ बहिणी असा परिवार आहे. नगर तालुक्यातील शेतकरी सीताराम रामभाऊ कडूस यांचे ते जावई होत.

## जुगार अड्ड्यावर छापा; १७.३३ लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर रोडवरील हॉटेल इंद्रायणीलगत असलेल्या पत्र्याच्या शेडच्या आडोशाला सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिस अधीक्षकांच्या विशेष पोलिस पथकाने छापा टाकून १७ लाख ३२ हजार ९९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यावेळी १२ इसमांना अटक करण्यात आली.

ही कारवाई २३ जुलै रोजी पहाटे करण्यात आली. याबाबत भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 19 July - 24 July 2025
सैयारा 08:15 AM I 02:00 PM 04:45 PM I 08:00 PM
निकिता रॉय 10:00 AM 02:30 PM
स्मर्फ्स 01:00 PM 05:15 PM
आय नो व्हॉट यू डिड लास्ट समर 07:00 PM 11:30 PM
सुपरमॅन 10:30 AM 09:00 AM
सितारे जमिन पर 05:00 PM I 10:45 PM 11:00 PM
टीप: शो च्या वेळा बदलू शकतात
Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now bookmyshow
नगर कॉलेज जवळ, जुडिओच्या वरती, अ.नगर
9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 18 जुलै ते 24 जुलै 2025
F1 The Movie Eng.- 10:20 PM
Maalik Hindi- 10:00 AM
Metro.. In Dino 12:45 PM 05:10 PM
Ye Re Ye Re Paisa-3 06:45 PM
Saiyaara 08:10 AM I 11:00 AM 12:30 PM I 01:50 PM 03:45 PM I 04:40 PM 05:45 PM I 07:30 PM 09:30 PM I 10:20 PM
Smurfs Hindi- 08:15 AM 08:35 PM
Superman 10:20 AM
Jurassic World 03:20 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow | CONNPLEX SMART THEATRE | AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

CERTIFICATE COURSE IN ADVANCE
ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त मॉल
महावीर मॉल...
- 4x6 साईझ कोल्हापूर चटई 99/- रु.
- पानिपत वेलवेट आसन 30/- रु
- कॉटन पायपुसणी मोठी 30/- रु
- जम्बो साईझ टॉवेल 99/- रु.
- कॉटन रुमाल 99/- रु. 10 नग
- मॅजिक बाथरूम मॅट 2X3 साईझ 149/- रु.
- डबल बेड बेडशीट 299/- रु
- लेडीज ट्रॅव्हल बॅग 99 /- रु.
मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# ‘जुगारी कृषिमंत्री हटाव’च्या घोषणा देऊन अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करुन ‘ठिय्या’

### राज्य सरकार कृषिमंत्रीचा राजीनामा घेत नाही, तो पर्यंत एकप्रकारे सर्व शेतकऱ्यांची अवहेलना सुरु



कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन दिले.

नगर – कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करुन ठिय्या देण्यात आला. यावेळी आंदोलकांनी जुगारी कृषिमंत्री हटावच्या घोषणा दिल्या.

जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या आंदोलनात शहर जिल्हा कार्याध्यक्ष अनिकेत कराळे, किसनराव लोटके, अशोक बाबर, प्रकाश पोटे, अथर खान, गौरव नरवडे, फरीन शेख, रुकैय्या शेख, अल्तमश जरीवाला, समीर पठाण, सरपंच शरद पवार, फय्याज तांबोली, अनिस शेख, आरिफ पटेल, जावेद शेख आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी यापूर्वी अनेकवेळा वादग्रस्त विधाने केलेली आहेत. शेतकऱ्यांबद्दल अर्वाच्य भाषेत उद्गार काढून त्यांचा अपमान देखील केलेला आहे. पंचनामा करण्यासाठी अधिकाऱ्यांना आदेश देतानाची अरेरावी, कर्जमाफी वरील वक्तव्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात त्यांच्या विरोधात संतापाची लाट आहे. एका कृषिमंत्रीने शेतकरी वर्गाविषयी अपशब्द वापरणे हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळिमा फासणारे आहे. तर नुकतेच कृषिमंत्री कोकाटे विधान परिषदेत अधिवेश सुरु असताना चक्क मोबाईलवर रम्मीचा जुगार खेळताना व्हिडीओ व्हायरल झाला आहे. यामुळे संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेचे भावना दुखावल्या गेल्या असल्याचे म्हंटले आहे.

ते नेहमीच वादग्रस्त वागत असताना राज्याची प्रतिमा मलीन होत आहे. त्यांच्याकडून शेतकरी वर्गाला कोणत्याही प्रकारचे न्याय व आधार मिळू शकणार नसून, पुरोगामी महाराष्ट्रात अशा व्यक्तीच्या ताब्यात कृषिमंत्री पदाची जबाबदारी ठेवणे म्हणजे संपूर्ण शेतकऱ्यांचा अपमान असल्याचे राष्ट्रवादीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालया समोर आंदोलन करुन कृषिमंत्री कोकाटे यांचा राजीनामा घेण्यासाठी राज्य सरकारकडे मागणी करणारे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांना देण्यात आले.

युवा पिढी ऑनलाईन जुगाराच्या आहारी जात असताना, त्यावर तात्काळ राज्य सरकारने बंदी आणण्याची गरज आहे. कृषिमंत्री कोकाटे महाराष्ट्राच्या विधी मंडळ असलेल्या पवित्र सभागृहात चक्क ऑनलाईन जुगार खेळत असतील तर, शेतकऱ्यांनी त्यांच्याकडून काय अपेक्षा ठेवावी. जो पर्यंत राज्य सरकार त्यांचा राजीनामा घेत नाही, तो पर्यंत एकप्रकारे सर्व शेतकऱ्यांची अवहेलना सरकारने चालवली आहे, असे अनिकेत कराळे म्हणाले.

## प्रेरणादायी अक्षरधन...

## शिक्षण क्षेत्रास सुधारणांची नितांत गरज

नुकताच भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या वतीने राज्यांची शैक्षणिक कामगिरी श्रेणी निर्देशांक (Performance Grading Index) जाहीर झाला. देशातील एकही राज्य वा केंद्रशासित प्रदेश यामध्ये दक्ष श्रेणी प्राप्त करू शकला नाही.



चंदीगडने १००० पैकी ७०३ गुण मिळवीत प्रथम स्थान घेतले तर महाराष्ट्राला मूल्यांकनात ५८२ गुण मिळाले. त्यामुळे सरकारी पातळीबरोबर शाळा स्तरावरील अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील बदल व प्रशासकीय प्रक्रियेतही बदलाच्या दिशेने पावले पडण्याची गरज आहे.

एकसंघ काम केल्याशिवाय कामगिरी उंचावता येणार नाही. त्यासाठी शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्वच संवर्गाशी संवाद राहण्याची नितांत गरज आहे.

राज्यात तिसरीचे वर्ग ९०% स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियंत्रणाखाली तर ८ वी ते १० वीचे वर्ग असलेल्या ९०% पेक्षा अधिक शाळा या खासगी व्यवस्थापन यांच्या पेक्षा अधिक शाळा या खासगी व्यवस्थापन यांच्या नियंत्रणात आहेत. यामुळे तेथील शाळांमधील अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन प्रक्रियांकडे अधिक लक्ष देणे आवश्यक.

ग्रामीण, शहरी, मागासवर्गीय, लैंगिकदृष्ट्या अशा विविध राज्य समतेच्या क्षेत्रात आपल्या राज्याची कामगिरी चांगली आहे पण इतर अनेक क्षेत्रांच्या संदर्भात प्रभावी भूमिका घेऊन अंमलबजावणी करावी लागेल.

शिक्षण हक्क कायद्यानुसार सर्व सुविधांची उपलब्धता महत्त्वाची आहे. १५ वर्षांपासून हा कायदा असून यात भौतिक सुविधांमध्ये अधिकाधिक गुण व मूल्यांकन प्राप्त केले पाहिजे. विद्यार्थीसह पालकांनाही यात सहभागी व्हावे यासाठी प्रयत्न करावे लागतील. ग्रामीण, आदिवासी, डोंगराळ भागात व उसतोडणी कामगार सारख्या फिरत्या विद्यार्थी, पालकांना सोयी सवलती पुरवल्या पाहिजेत.

आपण प्रगत राज्य म्हणवणारा महाराष्ट्र अजूनही बराच मागे तर बिहार, उत्तरप्रदेश यासारख्या ठिकाणी शिक्षणाची परिस्थिती काय असेल?

# एमआयडीसीतील सराईत गुन्हेगार ‘एमपीडीए’ कायद्यांतर्गत स्थानबध्द

### प्रस्तावास जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी, नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात केली रवानगी



संतोष धोत्रे याच्यावर ’एमपीडीए’ कायद्यांतर्गत स्थानबध्दतेच्या कारवाईचे आदेश प्राप्त झाल्याने त्याला ताब्यात घेतल्यावर एमआयडीसी पोलिसांचे पथक.

नगर – शहर व एमआयडीसी परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगार संतोष रघुनाथ धोत्रे (वय २७, रा. दावल मलीक चौक, नागापूर, अहिल्यानगर) याला अखेर ’एमपीडीए’ कायद्यांतर्गत स्थानबध्द करण्यात आले असून त्याची नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

संतोष धोत्रे याने एमआयडीसी व तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही वर्षांपासून विविध गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली होती. त्याच्या विरूध्द दरोडा, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, शस्त्र बाळगणे अशा अनेक गुन्ह्यांची नोंद असून त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे परिसरातील शांतता व कायदा–सुव्यवस्थेवर मोठा प्रश्न निर्माण झाला होता. संतोष धोत्रे याच्यावर विविधवेळी प्रतिबंधक कारवाया, तडीपारी व अन्य उपाययोजना करण्यात आल्या होत्या, मात्र त्या अपुऱ्या व निष्प्रभ ठरत होत्या. परिणामी त्याच्यावर एमपीडीए (महाराष्ट्र प्रतिबंधक गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम) कायद्यान्वये कठोर कारवाई करण्याचे ठरवण्यात आले. या कारवाईसाठी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी एमपीडीए कायद्यांतर्गत प्रस्ताव तयार करून प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती व अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांच्यामार्फत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे सादर केला.

पोलीस अधीक्षक घार्गे यांनी या प्रस्तावाची बारकाईने पडताळणी करून तो जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे शिफारस अहवालासह सुपूर्द केला. जिल्हादंडाधिकाऱ्यांनी प्रस्तावातील गंभीर बाबींचा विचार करून, संतोष धोत्रे याच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी एमपीडीए कायद्यान्वये त्याला स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. त्यानुसार संतोष धोत्रे याला ताब्यात घेऊन नाशिक येथील मध्यवर्ती कारागृहात रवाना करण्यात आले आहे. ही कारवाई स.पो.नि. चौधरी यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक मनोज मोंढे, विकास जाधव, विनोद परदेशी, स.फौ. राकेश खेडकर, राजू सुद्रिक, आडबल, सुरज देशमुख, किशोर जाधव, जयसिंग शिंदे, नवनाथ दहिफळे, अक्षय रोहकले, राजेश राठोड आदींच्या पथकाने केली.

## पोलीस ठाण्यात तक्रार न घेतल्याने आरडाओरडा करत ठाणे अंमलदाराला शिवीगाळ व धक्काबुक्की; गुन्हा दाखल

नगर – तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार न घेतल्याच्या कारणावरुन ड्युटीवरील पोलीस हवालदारास एकाने शिवीगाळ, दमदाटी व धक्काबुक्की करत सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याची घटना २२ जुलै रोजी रात्री ९.४५ च्या सुमारास घडली. या प्रकरणी राकेश छबुराव गुंजाळ (रा. प्रतिमा कॉलनी पाईपलाईन रोड अ.नगर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस हवालदार गणेश साठे यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी हे ठाणे अंमलदार ड्युटीवर असताना, एका महिलेची तक्रार नोंदवण्याचे काम करीत होते. त्यावेळी राकेश छबुराव गुंजाळ (रा. प्रतिमा कॉलनी पाईपलाईन रोड अ.नगर) हे त्यांच्या वडिलांसह पोलीस ठाण्यात आले व त्यांनी टाईप केलेल्या तक्रारीची प्रत दाखवून तक्रार नोंदवण्याची मागणी केली. संबंधित तक्रार कौटुंबिक व फसवणुकीचे आरोप असल्याने फिर्यादी यांनी गुंजाळ यांना याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्याशी संपर्क करण्यास सांगितले. याचा राग येऊन राकेश गुंजाळ याने पोलीस ठाण्यात आरडाओरडा करीत फिर्यादी यांना शिवीगाळ करत धक्काबुक्की केली आणि सरकारी कामात अडथळा निर्माण केला.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात राकेश गुंजाळ यांचे विरुद्ध सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार चांगदेव आंधळे हे करीत आहेत.

## बायपास रोडवर अपघात; मोटारसायकलस्वार ठार

नगर – भरधाव वेगातील मालट्रकने बुलेट मोटारसायकलला जोराची धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात मोटारसायकल स्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शेंडी बायपास रोडवरील द्वारकादास श्यामकुमार मॉलसमोर २२ जुलै रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडली. शैलेश मल्हारी झिंजुर्टे (वय ३८, रा. सोलापूर, हल्ली रा.चेतना कॉलनी, नवनागापूर) असे मयताचे नाव आहे.

याबाबत प्रशांत रमाकांत राऊत (वय ४०, रा. गजानन कॉलनी, नवनागापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. फिर्यादीने दिलेल्या माहितीप्रमाणे फिर्यादी यांचा मित्र शैलेश मल्हारी झिंजुर्टे हा यांची बुलेट (क्र. एम एच १३ इ एन ४३४०) ने एमआयडीसी परिसरातील दूध डेअरी चौक ते शेंडी बायपास रोडने जात असताना भरधाव वेगात आलेल्या मालट्रकने ( क्र.एम एच ४६ बी एफ ७६२८) त्याच्या बुलेटला जोराची धडक दिली. या धडकेत शैलेश झिंजूर्टे यांचा जागीच मृत्यू झाला असून, मोटारसायकलचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघातानंतर ट्रकचालक कोणतीही मदत न करता घटनास्थळावर ट्रक सोडून पसार झाला.

या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी करीत घटनेची माहिती घेतली. या प्रकरणी प्रशांत राऊत यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन ट्रकचालक आदिनाथ आधाव याच्याविरुद्ध बी एन एस कलम १०६ (१), १२५(ए) (बी), २८१, ३२४ (४) तसेच मोटार वाहन कायदा कलम १३४ (ए) (बी), १८४, १७७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार खेडकर करत आहेत.

# दिल्लीत पवार कुटूंबियांच्या स्वागताने भारावले निवृत्त शिक्षक

### शरद पवारांशी मनमोकळा संवाद, ऐतिहासिक आठवणींना दिला उजाळा



अहिल्यानगर जिल्ह्यातील २०० निवृत्त शिक्षकांना दिल्ली दौऱ्यावर घेऊन गेलेल्या खासदार निलेश लंके यांनी त्यांची ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या निवासस्थानी भेट घडवून आणली, त्यावेळी त्यांच्याशी संवाद साधताना शिक्षक.

नवी दिल्ली – संसद पाहण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील २०० शिक्षकांना दिल्लीला घेऊन गेलेल्या खासदार निलेश लंके यांनी २२ जुलै रोजी सकाळी त्यांची राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घडवून आणली. शरद पवार, सुप्रिया सुळे यांनी केलेल्या स्वागतामुळे हे सर्व शिक्षक अरक्षशः भारावून गेले.

पवार यांच्या निवासस्थानी भेटीप्रसंगी पवार यांनी अत्यंत सहज आणि हृदयस्पर्शी भाषेत शिक्षकांशी संवाद साधला. ते म्हणाले, आम्ही तर तुमचं स्वागत केलंच, पण वरूण राजानेही केले हे विशेष. या भागात फारसा पाऊस पडत नाही, पण वरूण राजालाही कळलं की हे शिक्षक दुष्काळी भागातून आले आहेत ! हा विनोदाचा क्षण क्षणभरात स्मितहस्याने रंगला. पवार यांचा संवाद शिक्षकांविषयी असलेल्या आपुलकीची साक्ष देत होता.

शिक्षकांनी त्यांच्या समस्या पवार यांच्यासमोर मांडल्या. त्या अडचणींवर बोलताना पवार म्हणाले, या समस्यांमध्ये आम्ही लक्ष घालू. ज्याज्यावेळी आम्ही सत्तेत होतो, त्यावेळी आम्ही शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतला. त्या काळात शिवाजीराव पाटील व इतर शिक्षक नेते होते त्यांच्याशी चर्चा करून आम्ही प्रश्न मार्गी लावत असू. त्या काळात केंद्र सरकार जे देते त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांना आम्ही देण्याचा निर्णय घेतला.त्यामुळे संघर्षाची वेळ आली नाही असे सांगत पवार यांनी भूतकाळाचीही आठवण यावेळी करून दिली.

यावेळी बोलताना पवार यांनी शिक्षकांना किती साली शिक्षक झालात ? त्यावेळी किती पगार होता ? कधी निवृत्त झालात ? आता किती निवृत्तीवेतन मिळते असे प्रश्न विचारले. त्यावर सुरुवातीचा पगार ९५ रूपये तर आता ४० हजार रूपये निवृत्तीवेतन मिळत असल्याचे उत्तर शिक्षकाकडून देण्यात आल्यानंतर खा. पवार त्या शिक्षकांकडे बोट दाखवत हसले आणि आम्ही भूतकाळात घेतलेल्या निर्णयांमुळे हा बदल झाल्याचे त्यांनी अप्रत्यक्षपणे सुचविले. त्यावर तुमच्यामुळेच आमचे जीवन सुखकर झाल्याचे शिक्षकांनी कृतज्ञतापूर्वक सांगितले.


### खा. निलेश लंके यांनी काय जादू केली?

शिक्षकांशी संवाद साधताना पवार म्हणाले, तुम्ही २१ जुलै रोजी संसदेचे कामकाज पाहिले. त्यासाठी तब्बल २०० पासेस मिळाले याचे मला आश्चर्य वाटले. मी अनेक वर्षे दिल्लीत आहे, परंतू पाच–दहा लोकांपेक्षा अधिक पासेस आम्हाला कधीही मिळाले नाहीत. लंके यांनी काय जादू केली माहिती नसल्याचे पवार यांनी सांगताच एकच हशा पिकला.

### शिक्षक म्हणजे जडणघडणीचा पाया

यावेळी खासदार निलेश लंके यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, ज्या शिक्षकांनी अनेक पिढया घडविल्या, त्यांच्या ऋणातून उतराई झाले पाहिजे या भावनेतून मी शिक्षकांसाठी नेहमी काही ना काही करत असतो. सेवानिवृत्त शिक्षकांच्या कार्यक्रमामध्ये त्यांनी आम्ही तुम्हाला दिल्लीला पाठविले, आता तुम्ही आम्हाला दिल्ली दाखवा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. ज्यांच्यामुळे आमच्या राहणीमानाचा दर्जा वाढला, ज्यांच्यामुळे आम्ही समाजामध्ये बसलो त्या शरद पवारांना आम्हाला दिल्लीत भेटायचे आहे, ही देखील शिक्षकांची भावना होती. त्यामुळे निवृत्त शिक्षकांच्या दिल्ली दौऱ्याचे नियोजन करण्यात आल्याचे ते म्हणाले.

## ज्ञानदेव कुसळकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – गुंडेगाव येथील आदर्श शिक्षक ज्ञानदेव गंगाराम कुसळकर (गुरुजी, वय ५८) यांचे २३ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गुंडेगाव येथील शुढळा नदीतीरी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना असा परिवार आहे.

## अर्जुनराव सपकाळ यांचे अल्प आजाराने निधन

भिंगार – गवळीवाडा भिंगार येथील रहिवासी अर्जुनराव रामराव सपकाळ (वय ६८) यांचे २३ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे, १ भाऊ, भावजय, चुलत भाऊ, पुतणे असा परिवार आहे. प्रभाकर व सागर सपकाळ यांचे ते वडील होत. हरदीन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांचे ते मोठे चुलत बंधू होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.






शहरातील विनापरवाना फलक कारवाई करून हटविताना महापालिकेचे कर्मचारी.

# विनापरवाना फलक महापालिकेने कारवाई करून हटवले

### अनधिकृत फ्लेक्स प्रकरणी गुन्हे दाखल करणार; महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांचा इशारा

नगर – महानगरपालिका क्षेत्रात परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात बॅनर, फलक, मोठे जाहिरात बोर्ड लावल्याचे प्रकार समोर आले आहेत. अशा अनधिकृत फलकांवर व फ्लेक्स बोर्डवर महानगरपालिकेमार्फत कारवाई सुरू करण्यात आली आहे. काही महिन्यांपूर्वी महानगरपालिका प्रशासनाने गुन्हे दाखल केले होते. दंडही वसूल करण्यात आला होता. आता पुन्हा फलक हटवण्याची कारवाई सुरू करण्यात आली असून, गुन्हेही दाखल करणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

अनधिकृत फ्लेक्स बोर्ड संदर्भात कारवाईसाठी न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनामार्फत सातत्याने आढावा घेऊन अनधिकृत फलकांवर कारवाई करण्यात आली आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक अशा ठिकाणी काही संस्था, नागरिक, व्यावसायिक आस्थापना, राजकीय कार्यकर्ते महानगरपालिकेची परवानगी न घेता फ्लेक्स बोर्ड लावत आहेत. महानगरपालिकेने अशा अनधिकृत फलकांवर कारवाई सुरू केली आहे. मंगळवारी सुमारे ४० पेक्षा अधिक फलक कारवाई करून हटवण्यात आले आहेत. ही मोहीम अशीच सुरू राहणार आहे.

तसेच, महानगरपालिका क्षेत्रात फलक लावण्यासाठी नागरिक, संस्था, व्यवसायिक आस्थापना, राजकीय कार्यकर्त्यांनी रीतसर अर्ज करून व शुल्क भरून परवानगी घ्यावी. शहरात विनापरवाना फलक आढळल्यास दंडात्मक कारवाईसह गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

## मेंढपाळच्या तंबूतून सोन्याचांदीच्या दागिन्यांसह रोख रकमेची चोरी

नगर – शहरातील क्लेरा ब्रुस हायस्कूलच्या मैदानात थांबलेल्या मेंढपाळाच्या तंबूतून अज्ञात चोरट्याने बकरे पाहण्याच्या बहाण्याने घुसून ५० हजारांची रोकड व सोन्याचांदीचे दागिने असा १ लाख ४० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला. ही घटना २२ जुलै रोजी सकाळी १० ते १०.३० या कालावधीत घडली.

या बाबत मेंढपाळ गुना दामा महानवर (वय २७, रा. गिलांडेमळा, पाटस, ता. दौड, जि. पुणे) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी हे कुटुंबासह आष्टीहून मेंढ्या चारत नगर येथे येऊन ते क्लेरा ब्रुस हायस्कूलच्या मैदानात तंबू टाकून वास्तव्यास होते. २२ जुलै रोजी सकाळी ९ च्या सुमारास फिर्यादी यांचे वडील दामा महानवर हे मेंढ्या चारण्यासाठी गेले असता, तंबूत त्यांची भाची सारीका एकटी होती. दरम्यान १०.३० वाजता दामा यांनी फोन करुन माहिती दिली की, सारीका घाबरलेली अवस्थेत त्यांच्याजवळ आली व सांगितले की, एक अनोळखी इसम बकरे पाहण्याच्या बहाण्याने तंबूत शिरला व नंतर पिशवी व घोड्याचा जाळ घेऊन निघून गेला.

यावेळी फिर्यादी व त्यांची आई सोनाबाई यांनी तातडीने तंबूत धाव घेतली असता, तंबूत ठेवलेले एक तोळ्याचे सोन्याचे लॉकेट, एक तोळ्याची नथ, सोन्याचा पानपोत, सोन्याचा डोळा, चांदीचे २५ भार वजनाचे कडे व ५० हजार रुपये रोख रक्कम असलेली पिशवी गायब असल्याचे लक्षात आले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुना महानवर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सहायक फौजदार संतोष बनकर करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### ‘ग्रीन टी’ने वजन कमी करा

वजन, पचनशक्ती सुधारण्यासाठी ग्रीन टी पिण्याचे आरोग्यदायी फायदे आहेत. शरिरातील अतिरिक्त चरबी जाळण्यासाठी ग्रीन टीचा वापर होतो. ग्रीन टी चयापचय वाढवते. ग्रीन टीमध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात याने रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी फायदा होतो. मेंदूच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी ग्रीन टी उपयुक्त आहेत. याने स्मरणशक्ती वाढते. ग्रीन टी हृदयासाठी फायद्याचे असल्याने हृदयविकाराचा झटका कमी करते. ग्रीन टी त्वचेला निरोगी ठेवण्यास मदत करते आणि वृद्धत्वाची प्रक्रिया कमी करते.

## पाककला

### कोको-मावा मोदक

**साहित्य :** मैदा २ वाट्या, तूप वा तेल मोहनासाठी व तळण्यासाठी, नारळाचा खव १ वाटी, खवा अर्धी वाटी, साखर दीड वाटी, सुकामेव्याचे तुकडे २ चमचे, तूप २ चमचे, खसखस (भाजून) अर्धा चमचा, वेलची पूड अर्धा चमचा, पाकासाठी साखर १ वाटी, पाणी अर्धी वाटी, केशरी रंग चिमूटभर, सजवण्यासाठी सुकामेवा, चारोळी, टूटीफ्रुटी, चांदीचा वर्ख.

**कृती :** सर्वप्रथम मैद्यात तूप वा तेलाचे मोहन टाकून पाण्यात घट्ट पीठ मळा. एका पॅनमध्ये तूप तापवून नारळाचा खव भाजा. नंतर त्यात साखर मिसळा. मिश्रण दाट झाल्यानंतर कुस्करलेला खवा मिसळा व भाजा. नंतर वेलची, टुटीफ्रुटी, सुकामेव्याचे तुकडे टाकून मिश्रण थंड होऊ द्या. नंतर साखरेचा तीनतारी पाक बनवा. त्यात थोडासा रंग मिसळा. आता मळलेल्या पिठाचा एक उंडा घेऊन लाटा. नंतर त्यात नारळाचे सारण भरा व पुरचुंडीप्रमाणे बंद करून मोदकाचा आकार द्या व गरम तुपात वा तेलात तळा. शेवटी सारे मोदक पाकात बुडवून काढा व सुकामेव्याचा चुरा वरून चिकटवा.

## सौंदर्य

❋ हिवाळ्यात चेहऱ्यावर व मानेवर शुध्द मधाचा लेप लावावा व सुकल्यानंतर पाण्याने धुवावा. ग्लिसरीन व गुलाबपाणी समप्रमाणात मिसळून त्यात १ लिंबू पिळावे व गाळून झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर, मानेवर व हाता-पायांवर लावावे. यामुळे त्वचा मुलायम, गुळगुळीत व चमकदार रहाते. चेहरा धुताना तळहातावर थोडेसे बेसन घेऊन त्यात थोडेसे दही मिसळून चेहऱ्यावर व मानेवर लेप करून चोळावे. नंतर पाण्याने धुवावे. दह्याऐवजी लिंबाचा रस वा दूधही वापरू शकता. एक चमचा मधात एक चमचा पाणी मिसळून चेहऱ्यावर व मानेवर लावा. वाळल्यानंतर पाण्याने धुऊन घ्यावे. यामुळे त्वचा मुलायम व कोमल होईल.

❋ उडीद डाळीची पावडर बनवून त्यात थोडेसे गुलाबपाणी, ग्लिसरीन व बदाम रोगन मिसळून चेहऱ्यावर लावावे. यामुळे चेहरा उजळतो.

## सल्ला

आयुर्वेदानुसार हिवाळा हा बलदायक, आरोग्यकारक काळ सांगितलेला आहे. शिशिर ऋतूत वातावरणात रुक्षता जास्त वाढते. झाडांची पाने गळतात. शिशिर ऋतूत पानगळ सुरू होते. त्यामुळे सर्व वृक्ष, लता, वेली, झुडुपे, एकूणच सर्व सृष्टी निस्तेज दिसू लागते. हिवाळ्यात शरीराची बाहेरची उष्णता कमी होते. त्यामुळे जाठराग्नी चांगलाच प्रदीप्त होतो. म्हणून हिवाळ्यात भरपूर भूक लागते. म्हणून या ऋतूत दोन्ही वेळा भरपूर प्रमाणात आहार घ्यावा. गोड, आंबट पदार्थांचे आहारात जास्त प्रमाण ठेवावे.

## वास्तू

घराच्या ब्रम्हस्थानात जीना, पिलर असल्यास कुटुंबातील व्यक्तींना लिव्हर किंवा किडनीचा त्रास होण्याचा संभव असतो.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २४ जुलै २०२५

**दर्श अमावास्या, दीप पूजन, गुरुपुष्यामृत, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, पुनर्वसु १६।४४, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ३६ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ :** काळजीपूर्वक कार्य करा. नोकरीत असलेल्या व्यक्तींनी कार्यात सहकार्य घेऊन चालावे.

**मिथुन :** हातावर हात ठेवल्याने कोणतेही कार्य होत नाही. कोणत्याही कार्यात बेपर्वाईने वागू नका.

**कर्क :** शत्रू प्रभावहीन होतील. कार्यक्षेत्रात नवीन प्रोजेक्टची सुरूवात करण्यापूर्वी यथायोग्य विचार करा.

**सिंह :** वेळ आनंदपूर्वक व्यतीत होईल. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील.

**कन्या :** कौटुंबिक आनंदाचे वातावरण राहील. दिवस आनंदात जाईल. आपला चंचल स्वभाव मात्र स्थिर ठेवावा.

**तूळ :** भावनात्मक स्वभावाचे असल्यामुळे आपणास नुकसान होणे शक्य आहे. पैसे देण्याच्या बाबतीत जपून वागावे लागेल.

**वृश्चिक :** वडिलधाऱ्यांचा आधार मिळाल्याने अडकलेली कार्य पूर्ण होईल.

**धनु :** भावनांच्या भरात वाहून जाऊन नुकसान होण्याची शक्यता आहे.


**मकर :** सामान्य स्थितीत मध्यम स्वरूपाची कार्ये पूर्ण होतील. प्रवासाचे योग संभवतात.

**कुंभ :** प्रेम व रोमांसच्या प्रकरणांमध्ये यश मिळेल. मित्र आपणास मदत करतील व काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील.

**मीन :** कामात अडचणी येण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. जुनी मित्र-मैत्रिणी भेटतील.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२२७ सौ.शैलजा कुलकर्णी



**उभे शब्द :-** १) उत्तरप्रदेशातील एक प्रसिद्ध औद्योगिक शहर ४) सुवर्ण; कांचन; सोने ७) एक प्रकारचे लोकनाट्य; निर्लज्जपणाचे वर्तन ९) दुष्ट माणूस १०) देवीचा नऊ दिवसांचा उत्सव १२) पाढ्यातील सहाची संज्ञा १५) मोठी वाटी १७) मुरड; उसण; लकाकी; चकाकी २०) जो घाबरत नाही असा; खंबीर २१) श्रीमंत; धनवान; सधन २२) दक्षिण भारतातील एक प्रमुख नदी २३) नाद; आवाज; ध्वनी २४) कानात घालावयाचा एक दागिना; कन्या २५) कातडे; साल

**आडवे शब्द :-** १) तुरुंगातील वास्तव्य; कैदेची शिक्षा २) कृष्णाला मारायला आलेली परंतु स्वतःच मेलेली एक राक्षसी ३) विष्णुपत्नी; लक्ष्मी ५) ऐट; चित्त आकर्षित करण्यासाठी केलेला खोटा हावभाव ६) लग्नाची बायको ८) ऐट; रुबाब; तोरा ११) ‘झारखंड’साठी हे नाव पण सुचविले गेले होते १३) दरवाजा; दार; द्वार १४) दंगा; धुमश्चक्री; उत्पात १६) वाघाचे ओरडणे १८) भिस्त; अवलंबून असणे; उंटाच्या पाठीवरचा उंचवटा १९) लाकूड कापण्याचे हत्यार २०) या वृक्षाचे पान भगवान शंकराला वाहतात २१) सोनेरी हरिणाचे रूप घेऊन सीतेला फसविणारा एक राक्षस

### शब्दगंध क्र. ७२२६ चे उत्तर



# ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ मुलांचे विश्व ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** धैर्य म्हणजे आशावादी जीवनाची कला आहे. **– वाडवे नराग्युइस.**

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पाण्यात खेळल्यावर न्यूमोनिया होतो का?

‘बच्चों पानीमें मत खेलो, नही तो न्यूमोनिया हो जाएगा’ हे वाक्य नक्कीच तुम्ही केव्हातरी ऐकले असेल. नाही आठवत? मग आठवा टीव्हीवरच्या सर्दीपडशाच्या जाहिराती. खरंच का पाण्यात खेळल्यावर न्यूमोनिया होतो? का लहान मुलांनी पाण्यात खेळू नये म्हणून उगीचच पालक भीती दाखवतात.?

श्वसनसंस्थेचे विकार हवेतील जंतूंचा शरीरात प्रवेश झाल्याने होतात. पाण्यात खेळल्यानंतर डोके ओलेच ठेवल्यास सर्दीच्या विषाणूंना सुयोग्य तापमान व वातावरण मिळते. विषाणूंनी एकदा संसर्ग केला म्हणजे कालांतराने जिवाणूंना (ह्यात न्यूमोनिया करणारा न्यूकोक्कस हा जिवाणू आहे) आक्रमण करणे सोयीस्कर जाते. त्यामुळे पाण्यात खेळल्यामुळे न्यूमोनिया होईल असे नाही, पण सर्दी झाल्यास न्यूमोनियाच्या जंतूंना शरीरात प्रवेश करणे सोपे जाते.

न्यूमोनिया म्हणजे फुप्फुसाची सूज. यात फुप्फुसाच्या वायुकोषांमध्ये मृतपेशी, रक्तातील द्रव, जंतू यांचे मिश्रण गोळा होते. साहजिकच वायुकोषात हवेला जागा राहत नाही. त्यामुळे फुप्फुसाच्या रक्त शुद्धीकरणाच्या कार्यावर परिणाम होतो. फुप्फुसाचा किती भाग रोगग्रस्त झाला आहे, त्यावरून ह्या कार्यावर किती गंभीर परिणाम होईल ते ठरते. न्यूमोनिया हा अल्प मुदतीचा सूक्ष्म जंतूमुळे होणारा रोग आहे व तो कोणालाही होतो. विशेषतः ५ वर्षाखालील मुलांमध्ये याचे प्रमाण जास्त आढळते व भारतात लाखो मुले या रोगाने दगावतात.

सतत ताप, खोकला, छातीत दुखणे, दम लागणे ही या रोगाची मुख्य लक्षणे आहेत. ताप व श्वसनाचा दर मिनिटाला ४० पेक्षा जास्त असल्यास, पाच वर्षाखालील मुलांमध्ये न्यूमोनिया असण्याची दाट शक्यता असते. उपचार न झाल्यास हा रोग प्राणघातक ठरतो. दररोज एक अशी पेनिसिलीनची ५ इंजेक्शने वा अँपिसिलीन वा सेप्ट्रॉन ही औषधे ५ दिवस होऊन रोग पूर्णपणे आटोक्यात आणता येतो. याखेरीज ताप कमी करण्यासाठी पॅरॉसिटॅमॉल व पचेल असा हलका आहारही उपयुक्त ठरतो.

### कोल्ह्याची थाप

एक कोंबडा खुराड्यात राहत होता. एकदा फिरत-फिरत तो बराच दूर आला. आजूबाजूची शोभा पाहण्यासाठी तो एका कुंपणावर चढून बसला आणि मग आनंदाने ओरडू लागला असता त्याचा आवाज ऐकून पलिकडच्या वाटेने चाललेला कोल्हा तिथे आला. कोंबडा कुंपणावर बसलेला पाहताच तो आपल्या तावडीत सापडणार नाही, असे लक्षात येताच कोल्ह्याने एक युक्ती करण्याचे ठरविले.

भोळेपणाचा आव आणीत कोल्हा म्हणाला, ‘‘काय मित्रा, कसा आहेस? तुला पाहून मला फार आनंद झाला. तुला कडकडून आलिंगन द्यावे, अशी माझी इच्छा आहे बघ. तेव्हा मित्रा, खाली उतरुन मला भेट गड्या,’’ त्यावर कोंबडा वरुनच म्हणाला, ‘‘कोल्हेदादा, मलासुद्धा तुम्हाला भेटायला आनंदच वाटला असता. तू माझा मित्र आहेस, म्हणून मला तुझी भीती वाटत नाही. पण मी खाली उतरल्यावर इतर प्राण्यांच्या तावडीत सापडलो, तर ते मला जिवंत सोडतील का? का उगीच मला संकटात लोटतोस? संकटात सापडण्यापेक्षा मी येथेच सुरक्षित आहे.’’

त्यावर कोल्हा म्हणाला, ‘‘अरे तुला भितीचे कसलेही कारण नाही. प्राणी आणि पक्षी यांच्यामध्ये तसा करार झाला आहे. जो कोणी कराराविरुद्ध वागेल, त्याला कडक शिक्षा होईल, असाही ठराव झाला आहे. ही गोष्ट तर सर्वांना समजली. मग तुलाच कशी कळली नाही?’’ असे दोघांचे बोलणे चालू असता मध्येच कोंबडा वाकडी मान करुन दूरवर पाहू लागला असता कोल्हा म्हणाला,’’ मित्रा, वाकडी मान करुन दूरवर काय बघतो आहेस? त्यावर कोंबडा म्हणाला, ’’ अरे भाऊ, तिकडून चार-पाच शिकारी कुत्रे इकडेच येताहेत, असे मला दिसते आहे.’’

कोंबड्याचे हे बोलणे ऐकताच कोल्ह्याची पाचावर धारण बसली. मनात घाबरुन तो म्हणाला,’’ अरे मित्रा, असे आहे तर मला येथून गेले पाहिजे. बरं, नमस्कार. हा मी निघालोच बघ.

तेव्हा कोंबडा त्याला थांबवीत म्हणाला, ‘‘अरे भाऊ, असे पळतोस कशाला? थोड्या वेळातच मी खाली उतरतो. तू मला कराराची जी गोष्ट सांगितलीस, ती जर खरी असेल, तर तुला भीती वाटण्याचे काही कारण नाही.’’ त्यावर कोल्हा म्हणाला,’’ नाही रे बाबा. असा करार झाला आहे हे जरी खरे असले, तरी तो कुत्र्यांना अजून समजला नसेल, तर ते मला ठार केल्याशिवाय सोडतील का?’’ असे म्हणत कोल्ह्याने तेथून पोबारा केला.

**तात्पर्य :** शेरास सव्वाशेर भेटतो, हेच खरे.

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

सन १९३० दशक के मध्य में ब्रह्माकुमारी आंदोलन के आरंभ से ही संस्थापक की यह पक्की धारणा थी कि यह संसार, जिससे हमारा परिचय हजार वर्ष का है, जल्दी समाप्त होने जा रहा है। उनकी अंतर्दृष्टि ने उन्हें बता दिया था कि एक प्रचंड विनाश का तूफान पूरे विश्व को अपनी चपेट में ले लेगा। भूचाल आएँगे, बाढ़ आएगी, प्रक्षेपास्त्रों का इस्तेमाल होगा और गृहयुद्ध छिड़ जाएँगे, जिनके कारण कोई भी जीवित नहीं बचेगा, सबको मरना होगा।

बाद में उन्होंने देखा कि एक नए संसार का उदय हो रहा है, जिसमें एकता है, प्रेम है और उसमें रहनेवाले लोगों की आध्यात्मिक शक्ति तथा जागरूकता इतनी नवीन एवं शुद्ध है कि उनकी तुलना देवी-देवताओं से की जा सकती है। बनारस में एक मित्र के घर में एक दीवार पर एक के बाद एक वृत्त खींचकर, ब्रह्माबाबाने हम सबको एक-एक शाश्वत नाटक में अभिनेताओं के रूप में कल्पित किया. उनकी कल्पना के अनुसार यह एक ऐसा नाटक था, जो समय के चक्र पर खेला जाता है, जिसका अंत आरंभ को जन्म देता है। उन्हें महसूस हुआ कि ईश्वर उनको दिखा रहा है कि नाटक अब एक ऐसे संक्रांति काल में प्रवेश कर रहा है, जिसमें पुराना नए को जन्म देगा। क्योंकि नवीन देवलोक को प्रकट होने के लिए, एक नई चेतना को पुराने के बीच सही जगह रखना जरूरी होता है।

यथासमय उन्हें इस बात का ज्ञान हो गया कि विश्वव्यापी परिवर्तन का कार्य परमात्मा, मानवजाति के कुटुंब के जनक (बीज) की जिम्मेदारी है और उसकी सफलता निस्संदेह पक्की है। तथापि ईश्वर क्योंकि अशरीरी है और भौतिक जगत् से परे है, इसलिए मानव को ही बदलने का प्रयास करना होगा। वे अपने अंदर शुद्ध चेतना की शक्ति को पुनः प्राप्त कर सकते हैं, जब उन्हें ज्ञान हो जाता है कि वे स्वयं आत्मा हैं, शरीर नहीं तो उन्हें परमात्मा का शुद्ध मन से स्मरण करना आ जाता है। उस स्मरण के द्वारा बीज के अंदर बसी सच्चाई की शक्ति फिर से संसार के अंदर प्रकट हो जाएगी।

नाटक के अंत में आत्माएँ अपने घर लौट जाएँगी, जो समय और आकाश के बाहर विद्यमान पूर्ण शांति का एक क्षेत्र है। फिर जब समय का चक्र एक बार फिर आरंभ होता है, हम अस्तित्व के नाटक में अपने चिरंतन स्थान के अनुसार अपनी-अपनी भूमिका निभाने के लिए चले आएँगे।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

यही आगे फ़रमा रहे हैं :

**आजु हमारे महा अनंद ।।**

हम खुशियों से भरपूर हो गए हैं, हम blissful state में पहुँच गए हैं, अंतर और बाहर से आनन्द की अवस्था में पहुंच गए हैं। परमात्मा को सत्, चित् और आनन्द कहा गया है। प्रभु के सच्चाई और चेतनता के पहलुओं के बारे में हम सुनते हैं, समझते हैं। लेकिन जो आनन्द का पहलू है, प्रेम का पहलू है, ecstasy का पहलू है, इसके बारे में हमें कुछ समझ में नहीं आता यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज यही समझा रहे हैं कि जब हम प्रभु के शब्द के साथ जुड़ जाते हैं, जब हम सत्गुरु के सच्चे सेवक बन जाते हैं, तो हम आनन्द से भरपूर हो में जाते हैं और जब गोबिन्द की हमें प्राप्ति हो जाए, गुरु से हम मिल जाएँ, तो वे हमें परमात्मा से जोड़ देते हैं। तब हमारी सभी चिन्तायें दूर हो जाती हैं, दुनिया के दुःख-दर्द, चिन्तायें, गम दूर हो जाते हैं।

**चिंत लथी भेटे गोबिंद।।**

आगे गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

आज हमारै बने फाग ।<br>
प्रभू संगी मिलि खेलन लाग।<br>
होली कीही संत सेव ।<br>
रंगु लागा अति लाल देव ।

आज के दिन जब हम प्रभु के शब्द के साथ जुड़ गए हैं, तो जो Dark Night of the Soul थी, आत्मा की अँधेरी रात थी, वह अँधेरी रात ख़त्म हो गई है और अपने प्रियतम के मिलने के साथ हमारी जिंदगी बहारों से भर गई है।

जब आत्मा शरीर को छोडकर अंड, ब्रह्मंड, पारब्रह्म को पार करके सचखंड पहुँचती है, तो वहाँ पर हम अपने गुरु में लीन होते हैं और जो परदे हमारी आत्मा पर होते हैं, वे एक-एक करके उतरते चले जाते हैं।

और जब हम प्रभु में लीन होते हैं, तो हमारी हालत ऐसी होती है, जैसे किरण वापिस सूर्य में जाकर मिल गई हो, बूंद महासागर में मिल गई हो। इसी तरह हम प्रभु का हिस्सा बन जाते हैं और जब हम प्रभु का हिस्सा बन जाते हैं, तो इस दुनिया का और अगली दुनिया का सारा ज्ञान हमें प्राप्त हो जाता है। उस ज्ञान और आनन्द की अवस्था में हमें पहुँचना है। यहाँ पर गुरु अर्जनदेव जी महाराज यही फरमा रहे हैं कि जब हम अंतर्मुख होकर प्रभु के साथ जुड़ते रहते हैं, तो क्या-क्या होता है :

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

‘गुरुजी फळ्यावर लिहितात ते मला अजिबात दिसत नाही!’<br>
डॉक्टरांनी डोळे तपासले. काहीच दोष आढळला नाही. तेव्हा डॉक्टरांनी विचारलं,<br>
‘बाळ, तुला का बरं फळ्यावरचं दिसत नाही?’<br>
माझ्या समोरच्या बाकावर एक उंच मुलगा बसतो!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❋ आंतरराष्ट्रीय सौर ऊर्जा संघटनेची १० ऑक्टोबर २०२२ ची पाचवी परिषद कोणत्या शहरात आयोजित करण्यात आली? – नवी दिल्ली

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

अन्नपूर्णा देवीमंत्र –

**श्रीं ऱ्हीं क्लीं नमो भगवति अन्नपूर्णे ममभिलविषमन्नं देहि देहि स्वाहा । दर्शनसिद्धि भवति ।।**

### बौद्धिक विकास कसा करावा?

चौथ्या महिन्यात अन्नप्राशन संस्कार करुन बाळाला इतर आहाराची सुरुवात करावी, असे जरी सांगितले आहे, तरी आजच्या काळात मला असे वाटते, की बाळाच्या रसनेंद्रियाचा, घ्राणेंद्रियाचा विकास लवकर होऊन मेंदूचा विकास होण्यासाठी अन्नप्राशन विधी पंधरा दिवसांत करुन घ्यावा. बाळ पंधरा दिवसांचे झाल्यावर फळांचे रस अगदी थोड्या प्रमाणात त्याला द्यावेत. फळांचा रस हा र आंबड-गोड असल्याने बाळाच्या मेंदूला चालना त्वरित मिळते व त्यातून बौद्धिक विकास माता येतो. त्याचबरोबर त्यामध्ये अ, ब, क जीवनसत्त्वे असल्या मुळे बाळाची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. या वयातच जिभेला विविध फळांच्या रसाची चव माहिती झाल्यामुळे पढील आयुष्यात बाळ इतर आहार घेण्यास पटकन तयार होते. फक्त या काळात जास्तीत जास्त स्तनपानाला महत्त्व देऊन दुपारी १२ च्या नंतर एखाद्या फळाचा रस अगदी थोड्या प्रमाणात द्यावा. जर हा रस बाळाला चांगला पचला, उलटी झाली नाही, तर फळामध्ये बदल करून रोज एक रस देत जावे. बाळाला ज्या प्रकारचा आहार दिला जाईल, त्या प्रकारे त्याचा शारीरिक व मानसिक विकास होईल. बाळाचे आरोग्य सुदृढ करण्याबरोबरच त्याची स्मरणशक्ती, बुद्धिमत्ता, निर्णयक्षमता, सृजनशीलता वाढवायची असेल, तर योग्य सकस आहार घेणे आवश्यक आहे. ‘जसे अन्न तसे मन’. आहाराचा आणि मनाचा संबंध असतो, हे आपल्याला माहीतच आहे. म्हणून बाळाचे मन सुसंस्कारित, सात्त्विक करायचे असेल, तर सत्त्वगुणयुक्त आहाराला प्राधान्य द्यायला हवे. बाळाने आवडीने खाल्लेले अन्न त्याच्या शरीराच्या व मेंदूच्या प्रत्येक पेशीपर्यंत जाऊन शरीराचे व मेंदूचे पोषण होत असते, हे आता संशोधनाद्वारे सिद्ध झाले आहे. त्यामुळे वरण-भात आवडीने खाल्ला, तरी बाळाचे पोषण व्यवस्थित होते. याउलट अगदी साजूक तुपातला शिरा जरी जबरदस्तीने बाळाला खाऊ घातला. तरी बाळाचे पोषण होणार नाही. म्हणून बाळाला कधीही जबरदस्तीने खाऊ घालू नये.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त उत्कृष्ट देखावा स्पर्धेचे आयोजन

## पारंपारिक हिंदू संस्कृती जपत डीजे मुक्त व पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन

नगर – गणेशोत्सवानिमित्त अहिल्यानगरच्या विचार भारती व बन्सीमहाराज यांच्या संयुक्त विद्यमाने उत्कृष्ट देखावा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे हे तिसरे वर्ष आहे. यावर्षी उत्कृष्ट देखावा स्पर्धेसाठी प्रबोधनात्मक, ऐतिहासिक, हिंदू संस्कृती व भारतीय जीवनशैली, विकसित भारत अशा १० विविध विषयांवर गणेश मंडळांनी देखावे सादर करावेत. शहरातील व उपनगरातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी पारंपारिक हिंदू संस्कृती जपत डीजे मुक्त व पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करत आहे. यावर्षी पासून नगर शहराबरोबरच सावेडी व केडगाव उपनगर भागातील उत्कृष्ट देखाव्यांनाही पारितोषिके देण्यात येणार आहेत, अशी माहिती गणेशोत्सव देखावे स्पर्धा प्रमुख रवींद्र बारस्कर यांनी दिली.


गणेशोत्सवानिमित्त होणाऱ्या उत्कृष्ट देखावा स्पर्धेची माहिती देण्यासाठी आयोजित बैठकीत बोलताना स्पर्धा प्रमुख रवींद्र बारस्कर. समवेत सचिव सुधीर लांडगे, राजकुमार जोशी, रवींद्र मुळे, अनिल मोहिते आदी.

उत्कृष्ट देखावा स्पर्धेची माहिती देण्यासाठी शहरातील व उपनगरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक दादा चौधरी विद्यालयात झाली. यावेळी विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे, बन्सीमहाराज मिठाईवाले फर्मचे राजकुमार जोशी, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, रवींद्र बारस्कर, समन्वयक अंकुश गोळे, अशोक गायकवाड, रवींद्र मुळे, संतोष गेनाप्पा आदींसह मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

स्पर्धेसाठी देण्यात आलेले विषय पुढील प्रमाणे, १) पहेलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर. २) भारतीय क्रांतिकारकांचे स्वातंत्र्य लढ्यातील प्रसंग उदा. रणावीण स्वातंत्र्य कुणा मिळाले, १८५७ चा लढा, सावरकर यांचा लढा व आझाद हिंद सेना. ३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी आणि सांस्कृतिक भारत उदा. घाट निर्मिती, मंदिर जीर्णोद्धार आणि धर्मशाळा निर्माण. ४) छत्रपती शहाजीराजे आणि अहिल्यानगर यामध्ये भातोडीची लढाई, जीपीओ चौकातील अमृतेश्वर मंदिर व विजय हनुमान मंदिर व प्रेमगिरी किल्ला. ५) नेवासा येथील विश्व कल्याण ग्रंथ निर्मिती ज्ञानेश्वरी व पैस खांब. ६) भारतीय जीवनशैली मधील कुटुंब व्यवस्था. ७) आमचे सार्वजनिक उत्सव आणि सामाजिक प्रबोधन डीजे मुक्त उत्सव. ८) भारतीय जीवन शैलीतील पर्यावरण मूल्य यात विविध परंपरा उत्सव यातील पर्यावरण महत्त्व, वटपौर्णिमा उत्सव, तुळशीचे महत्व. ९) विकसित भारतातील नागरी कर्तव्य – नागरी व्यवहार, कायद्याचे पालन, संविधानातील कर्तव्य आणि अधिकार. १०) स्वातंत्र्याच्या स्व च्या कल्पना – आत्मनिर्भय भारत, स्वभाषा, स्वदेश जीवनशैली. गणेश मंडळांनी या विषयांना अनुसरून आकर्षक देखावे सादर करून समाज उत्सवाचा समाज प्रबोधनाचा उद्देश साध्य करावा.

यावेळी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी विविध सूचना करून चर्चा केली. अंकुश गोळे यांनी आभार मानून स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सावेडी भागातील संपत नलावडे, करण कराळे, मुकुंल गंधे., मध्य शहर भागातील कमलेश भंडारी, सुहास पाथरकर, गजेंद्र सोनवणे, महेश कुलकर्णी, राहुल जामगावकर, सुनील नागोरी., केडगाव भागातील भरत ठुबे, सुजय मोहिते, निलेश चिपाडे यांच्याशी संपर्क साधावा. तसेच सुधीर लांडगे ९८२२०५९०१९, रवींद्र बारस्कर ९४२२२२१३३३, व अंकुश गोळे ९४२२२२५१०८ यांच्याशी संपर्क साधावा.


नालेगाव येथे लक्ष्मीआई यात्रा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

# नालेगाव मधून निघाली लक्ष्मीआई यात्रा

## पोतराजांच्या नृत्याने वेधले लक्ष; भाविकांनी केला लक्ष्मीमातेचा जयघोष

नगर – शहरातील नालेगाव येथे लक्ष्मीआई यात्रा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नालेगाव परिसरातून पारंपारिक वाद्यांच्या गजरात मिरवणुक काढण्यात आली होती. यामध्ये पारंपारिक वाद्यांच्या गजरात पोतराजसह भाविक सहभागी झाले होते. कलशधारी महिला, पोतराज व घोड्यांच्या बग्गीत असलेल्या लक्ष्मीमातेच्या मुर्तीने सर्वांचे लक्ष वेधले. भंडाऱ्याची उधळण करीत भाविकांनी लक्ष्मीमातेचा जयघोष केला. पवन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या यात्रेत संगीता पवार, शिवम पवार, लक्ष्मण सारसर, प्रशांत दळवी, भैय्या गोरे, गणेश पवार, यश पवार, आदित्य सकट, हर्षल सारसर, आदर्श साळुंके, मुन्ना शेख, गणेश भुजबळ, राहुल रोहकले, गौरव सोनिस, आकश दिवटे आदींसह भाविक सहभागी झाले होते.

या यात्रेला ४५ वर्षाची परंपरा असून, पवार कुटुंबियांच्या वतीने दरवर्षी लक्ष्मीआई यात्रा उत्साहात साजरी केली जाते. विधीवत पूजा करुन लक्ष्मी मातेची उत्सवमुर्तीची मिरवणुक शहरातून काढण्यात आली. संबळ, हलगी, ढोल व ताशांच्या निनादात पोतराजांनी स्वत:वर आसूडचे फटके ओढले. आसूड ओढताना चट्टचट्ट हा एकच आवाज परिसरात घुमला होता. यावेळी भाविकांसाठी भंडाऱ्याचे देखील आयोजन करण्यात आले होते.

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा.गणेश शिरसाठ यांना पी.एच.डी.पदवी प्रदान



नगर – विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा.गणेश कैलास शिरसाठ यांना नुकतीच युनिव्हर्सिटी ऑफ इंजिनीअरींग अ‍ॅण्ड मॅनेजमेंट, जयपुर येथुन आय.ओ.टी. बेस इफिसीयंट एनर्जी मॅनेजमेंट सिस्टीम फॉर स्मार्ट होम या विषयावर इलेक्ट्रीकल इंजिनीअरींग या क्षेत्रातील विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. सदर अभ्यासक्रमात त्यांना डॉ.अंकित कुमार शर्मा, असो. प्रोफेसर अ‍ॅण्ड हेड ऑफ इलेक्ट्रीकल इंजिनीअरींग डिपार्टमेंट, युनिव्हर्सिटी ऑफ इंजिनीअरींग अ‍ॅण्ड मॅनेजमेंट, जयपुर यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ.गणेश शिरसाठ यांच्या या विषयावरील रिसर्चचा अभ्यास करत असताना त्यांनी इंटरनॅशनल स्कोपस या जर्नल्समध्ये ०२ पेपर प्रेझेंटेशन केले. तसेच इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये त्यांचे वरील विषयावरील एकुण ०३ पेपर्सचे पब्लीकेशन झालेले आहे.

या यशाबद्दल संचालक सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ.रविंद्र नवथर, तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, सेक्रेटरी जनरल डॉ.पी.एम. गायकवाड यांनी त्यांचे कौतुक केले.

# लालटाकी येथे लक्ष्मीआईची यात्रा उत्साहात

## पारंपारिक वाद्यात पोतराजसह निघालेल्या शोभायात्रेने वेधले लक्ष

नगर – महालक्ष्मी माता मित्र मंडळाच्या वतीने आषाढी अमावस्यानिमित्त लालटाकी येथे लक्ष्मीआईची यात्रा उत्साहात पार पडली. मंडळाचे अध्यक्ष साहेबराव काते यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या शोभायात्रेत पारंपारिक वाद्यांच्या गजरात पोतराज व भक्तगण सहभागी झाले होते.

साहेबराव काते हे महालक्ष्मीचे भक्त असून, सालाबाद प्रमाणे दरवर्षी ते यात्रा उत्सवाचे आयोजन करुन, शोभायात्रा काढत असतात. या सोहळ्याचे हे २४ वे वर्ष असून या शोभायात्रेचे प्रारंभ लालटाकी भारस्कर कॉलनी येथून झाले. पारंपारिक वाद्यांचे गजर व लक्षीमातेच्या जयघोषाने परिसर दणाणून निघाला. सर्जेपुरा, दिल्लीगेट, न्यु आर्टस महाविद्यालय मार्गे लालटाकी येथील लक्ष्मीमाता मंदिरात या शोभायात्रेचा समारोप झाला. शोभायात्रेनंतर भाविकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. याचा भाविकांसह परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला.


महालक्ष्मी माता मित्र मंडळाच्यावतीने आषाढी अमावस्यानिमित्त लालटाकी येथे लक्ष्मीआईची यात्रा पार पडली.

यावेळी साहेबराव काते, सुशिलाबाई काते, आदिनाथ काते, योसेफ काते, राजू काळुंखे, मच्छिंद्र वैरागर, बहिरुनाथ वैरागर, सागर काते, संदीप त्रिभुवन, दत्तात्रय जाधव, अलंकार भोगले, यश जाधव, अनिता जाधव, आशाबाई मोहिते, सुनिल वैरागर, कार्तिका वाघमारे, भारती कुचेकर, गुनाबाई भोसले, भाग्यश्री मोहिते, संगिता कांबळे, सिताबाई वडागळे आदीसह भाविक उपस्थित होते.

# स्मृतीगंध ७९ रिवाइंड सिताराम सारडा विद्यालयाच्या १९७९ च्या बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात

नगर – चार दशके उलटून गेली, आयुष्याच्या वेगवेगळ्या वाटांवर, जबाबदाऱ्यांच्या गर्दीत हरवून गेलेले दहावी १९७९ च्या बॅचचे विद्यार्थी स्मृतीगंध ७९ – रिवाइंड या सुंदर स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा एकत्र आले. हा केवळ एक कार्यक्रम नव्हे, तर शालेय आठवणींचा सुवर्णपुष्पगुच्छ ठरला. शाळेतील काळ म्हणजे आपले जीवनातील सर्वात निरागस, निष्पाप आणि सुंदर क्षण. त्या दिवसात नक्की काय मिळालं हे लक्षात नसेल, पण कोण मिळालं हे मात्र कायम आठवतं, आणि हे कोण म्हणजे सर्व मित्र मैत्रिणी! हा दिवस हा फक्त भेटीगाठींचा नाही, तर त्या आठवणींना उजाळा देण्याचा, त्या जुन्या मैत्रीला नव्या उमेदीने पुन्हा जपण्याचा ! यांतील काहींनी मोठे यश मिळवले, काहींनी संघर्षातून विजय मिळवला, आणि काहींना आयुष्याच्या साधेपणात आनंद सापडला. पण या सर्वांचं मूळ एकच सिताराम सारडा विद्यालय आहे, असे प्रतिपादन भानुदास महानूर यांनी केले.


स्मृतीगंध ७९ रिवाइंड सिताराम सारडा विद्यालयाच्या १९७९ च्या बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात झाला.

अहिल्यानगर येथील सिताराम सारडा विद्यालयाच्या १९७९ मध्ये दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा स्मृतिगंध ७९ रिवाइंड हा स्नेहमेळावा नुकताच कॅफे फरहत येथे पार पडला. तब्बल ४६ वर्षांनंतर ४५ जुने वर्गमित्र एकत्र आले. चार दशके उलटल्यानंतर पुन्हा एकदा जुन्या मित्रांना भेटण्याचा आणि संवाद साधण्याचा अनुभव सगळ्यांसाठीच भावुक व आनंददायक ठरला.

या भेटीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्या सुवर्ण आठवणींना उजाळा देताना, शालेय किस्से, बालसुलभ खोड्या आणि जुन्या गोष्टी शेअर केल्या. काही सहभागी सदस्यांनी मराठी व हिंदी गीते, तसेच भावस्पर्शी गजल सादर करून वातावरण अधिकच उत्साही व भावनिक केले. या स्नेहमेळाव्याच्या आयोजनासाठी भानुदास महानूर, युनुसभाई तांबटकर, कृष्णा काळे, संपत पितळे, किरण सोनग्रा, नरेंद्र गोयल आणि परमानंद तलरेजा या जुन्या विद्यार्थ्यांनी विशेष पुढाकार घेतल्या बद्दल त्यांच्या चमूचे सर्व विद्यार्थ्यांनी आभार मानले. त्यांच्यामुळे हा क्षण अविस्मरणीय बनला आहे.

जीवनात कितीही पुढं गेलो, तरी शाळेच्या आठवणी म्हणजे मनाच्या दालनात जपलेलं सोनं आहे. आणि त्या सोन्याला पुन्हा उजाळा मिळाला. या मैत्रीचा गंध असा अखंड दरवळत राहो, आणि आपण दरवर्षी असंच पुन्हा भेटत राहो, हीच शुभेच्छा अनेक मित्रांनी एकमेकांचा निरोप घेतांना व्यक्त केली. कार्यक्रमाचा समारोप होऊच नये असं वाटत असतांना संध्याकाळी ५.३० वाजता सर्वांनी जड अंतःकरणाने एकमेकांचा निरोप घेतला.

# आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान गांधीची रेडिओवर मुलाखत

नगर – नगरचा आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान गांधी यांची रेडिओ नगर ९०.४ एफ.एम. या चॅनलवर २४ जुलै रोजी रात्री ९ वाजता मुलाखत प्रसारित होणार आहे. क्रीडा झेप या कार्यक्रमाअंतर्गत अजय धोपावकर ही मुलाखत घेणार आहेत. श्रोत्यांसाठी या मुलाखतीचे पुनर्प्रक्षेपण २७ जुलै रोजी रात्री ९ वाजता होणार आहे.



कॉर्फबॉल या खेळाविषयीची विस्तृत माहिती यानिमित्ताने खेळाडू, पालक तसेच इच्छुकांना मिळणार आहे. या मुलाखत प्रसारणाचा लाभ घेण्याचे आवाहन अ.नगर जिल्हा कॉर्फबॉल असोसिएशनचे अध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, खजिनदार सी.ए.अजय गांधी व असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय येथे शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालयात शालेय साहित्य वाटप

नगर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय, रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर येथे शालेय साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. दिपक लोंढे, शरद दळवी आणि सोमनाथ रोकडे यांच्या पुढाकाराने आणि सद्भावनेतून विद्यार्थ्यांना वह्या तसेच विविध शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा लाभ झाला. आणि शिकण्यासाठी अधिक प्रेरणा मिळाली.

उपस्थितांच्या हस्ते शाळेतील मागील वर्षी स्टुडन्ट टॅलेंट सर्च परीक्षेमध्ये नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले.

आमदार संग्राम जगताप यांनी विद्यार्थी आणि पालकांना संबोधित केले. महानगरपालिकेची रेल्वे स्टेशन येथील ही शाळा सर्वात मोठी शाळा असून येथील पटसंख्या व दर्जा टिकवून ठेवण्यामागे येथील शिक्षकांचे कष्ट आणि योगदान असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. तसेच लवकरात लवकर ही शाळा अत्याधुनिक सेवा सुविधायुक्त करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सोबतच रेल्वे स्टेशन परिसरातील विविध विकास कामांचा आढावा आपल्या मनोगतातून स्पष्ट केला.

कार्यक्रमासाठी माजी नगरसेवक विजय गव्हाळे, संभाजी पवार, मयूर बांगरे, दत्ता खैरे, अनिल येलमामे, सचिन पवार, अमोल रणदिवे, आकाश निरभवने, अभिजीत गायकवाड, संतोष मदनाल, विलास भिंगारदिवे, कार्तिक घोडके उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून मुख्याध्यापक विजय घिगे यांनी सामाजिक कार्यकर्त्यांचे शाळेच्या विकासासाठी मिळणारे सहकार्य हे अत्यंत मोलाचे असल्याचे अधोरेखित केले.

सूत्रसंचालन मनिषा शिंदे यांनी केले. तसेच विठ्ठल आठरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भारती कवडे, मनिषा गिरमकर, वर्षा गायकवाड, दिपाली नवले, शबनम सय्यद आदी शिक्षकांनी मेहनत घेतली.

कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये आनंद आणि प्रेरणा निर्माण केली असून शाळा, शिक्षक व पालक वर्गाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

# विद्यार्थ्यांनी अ‍ॅबॅकसमध्ये एव्हरेस्ट गाठले

नगर – गणितीय कौशल्य आत्मसात करीत आपली अंगभूत क्षमता विकसित करण्यासाठी प्राथमिक स्तरापासूनच आजचे विद्यार्थी अबॅकसच्या माध्यमातून गणितामध्ये प्राविण्य मिळवताना दिसतात


३५ व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेमध्ये यशस्वी झालेले एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीचे विद्यार्थी. (छाया – लहू दळवी)

एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीने संगमनेर येथे ३५ व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेचे २० जुलै रोजी विघ्नहर्ता लॉन्स संगमनेर येथे आयोजन करण्यात आले. फक्त पाचच मिनिटांच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी १९० पर्यंत बेरजा, गुणाकार, भागाकार केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, एशिया आयकॉनिक पुरस्कार विजेते शांताराम देशमुख, जिल्हा परिषद सदस्य जालिंदर वाकचौरे, गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब पुंड, एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्ष जयश्री थोरात, लेखिका श्रीमती स्मिता गुणे, प्रवरा विद्यालय इंदोरी प्राचार्य शांताराम मालुंजकर आदी उपस्थित होते.

### एव्हरेस्ट अ‍ॅकॅडमीची ३५ वी राष्ट्रीय स्पर्धा

या परीक्षेसाठी संगमनेर, अकोले व जुन्नर तालुक्यातून १२५० विद्यार्थी सहभागी झाले होते. अकॅडमीने कांचन गुजर, सुरेखा गवांदे यांना बेस्ट टीचर पुरस्कार दिला. वंदना थोरात यांना स्टार टीचर तर विद्या देशमुख यांना युनिव्हर्सल कोच पुरस्कार देण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये लहान गटात मनस्वी खर्डे, अन्वेष पवार, दूर्वा गिरी, यश दिघे, शिवश्री गडाख, वैभवी उकिरडे, साईशा गायके, वेदांत, वाडीया, सोहम कुटे, भक्ती अमुप, अवनी मरकड, आमिरा शेख हे लहान गटात चॅम्पियन ठरले. मोठ्या गटात अभिनव तांबे, श्रेयश खतोडे, अमेय देशमुख, खुशी हिरे, देवेश यादव, विराज गावंडे, कृष्णा दिघे, आराध्य गोरडे, इशिता गडाख, स्वामिनी देशमुख, ईश्वरी आमले, आदिती गोरडे, सोफिया शेख, स्वरा गुंजाळ, श्रावणी पडेकर, ऋतुपर्ण गायकवाड यांनी चॅम्पियन पद पटकावले.

यशस्वी विद्यार्थ्यांना एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या शिक्षकांचे मार्गदर्शन तसेच पालकांचे सहकार्य लाभले.

अकॅडमीचे सध्या अहिल्यानगर जिल्हा परिषद शाळांमध्ये मोफत अबॅकस प्रशिक्षण सुरू आहे. याचा फायदा जिल्हा परिषद विद्यार्थ्यांना होत आहे, असे अकोले गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत व संगमनेरचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अमोल बागुल यांनी केले.

# महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेची २७ जुलै रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा

नगर – महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेची प्रथम वार्षिक सर्वसाधारण सभा २७ जुलैला आयोजित करण्यात आली आहे. या सभेस प्रमुख पाहुणे म्हणून कृतिशील संघटनेचे नाशिक विभागीय अध्यक्ष तथा सचिव, लाक्षेवि. (से. नि.) जलसंपदा विभाग इंजि. प्रकाश भामरे व विभागीय महिला सरचिटणीस श्रीमती सुनंदा जरांडे व मध्यवर्ती संघटना, पुणे येथील पदाधिकारी उपस्थित राहणार आहे. या सभेत प्रशासकीय अहवालाचे वाचन, वर्षात झालेल्या जमा–खर्चाचा अहवाल, वार्षिक अंदाजपत्रकास मंजूरी तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविणेबाबत, तसेच इतर संघटनांना संलग्न करणेबाबत विचार विनीमय करण्यात येणार आहे. सभासद नोंदणी अभियानात केलेल्या कार्यवाहीबाबत योगदान दिलेल्या सदस्यांचा गुणगौरव करण्यात येणार आहे. सभासदांनी २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता ''देवांग कोष्टी समाज सभागृह'', समाजकल्याण भवनाशेजारी, नगर–मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे उपस्थित राहावे असे सचिव इंजि. रामदास साळी यांनी आवाहन केले आहे.

# आचार्यश्रींच्या जन्मजयंतीनिमित्त आनंदधाम येथे सहजोडा जाप, तेला तप व भव्य आयंबिल कार्यक्रम



नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचा १२५ जन्मोत्सव आनंदधाम येथे साजरा होणार आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २४ जुलै रोजी सकाळी ८.३० ते ९ यावेळेत सहजोडा जाप कार्यक्रम होणार आहे. याचदिवशी गुरुपुष्य अमृत सिध्दी योगानिमित्त सकाळी ९ ते १० यावेळेत म्युझियम विषयावर प्रवचन होईल. तसेच गुरू चरण कमल पूजा होणार आहे. २५ जुलै रोजी गुरु गुण गौरव, गुरू चरण कमल पूजा होणार असून तेला तप आराधना तसेच केशर गुलाब मंगल कार्यालयात भव्य आयंबिल होणार आहे.

जैन धर्मियांचे प्रमुख श्रध्दास्थान असलेले, भक्तांचे आनंदबाबा म्हणून परिचित असलेले, ज्यांच्या पदस्पर्शाने अहिल्यानगरचे नाव भारताच्या नकाशात आदराने घेतले जाते, असे १९ व्या शतकातील महापुरुष राष्ट्रसंत आचार्यसम्राट आनंदऋषिजी म.सा. यांच्या १२५ व्या जन्मोत्सवाची पूर्णाहुती श्रावण शुध्द प्रतिपदा एकम् म्हणजेच २५ जुलै रोजी होत आहे.

गुरुदेव आनंदऋषीजी महाराजांचा जन्म अहिल्यानगर जिल्ह्यातील शिराळ चिचोंडी येथे झाला. बालपणी मिळालेले मातापिताचे सुसंस्कार तसेच क्षणभंगुर जीवनाची जाणीव करुन देणाऱ्या घटनांमुळे बालक नेमीचंदने पंडित रत्न रत्नऋषिजी महाराजांच्या सानिध्यात वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी मिरी येथे जैन भागवती दीक्षा घेतली. आनंदधाम, अहिल्यानगर ही आचार्यश्रींची कर्मभूमी व निर्वाण भूमी आहे. तप, त्याग, संयमाची उत्कृष्ट साधना करुन त्यांचे जीवन आत्मविकासाच्या उच्च श्रेणीवर पोहोचले. तसेच गुरुदेवांचे अलौकिक कार्य मानव जातीसाठी विशेष वरदान बनले.

अशा युगपुरुषाच्या १२६ व्या जन्म जयंती निमित्त संपूर्ण देशभरात तसेच परदेशातही १ लाख २५ हजार तेला तप आराधना करण्याची घोषणा श्रमण संघाचे वर्तमान आचार्य ध्यानयोगी शिवमुनिजी म.सा., युवाचार्य महेन्द्रऋषिजी म.सा.यांनी केली आहे. तसेच आचार्य भगवंतांचे शिष्य महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषिजी म.सा., प्रबुध्द विचारक आदर्शऋषिजी म.सा. यांनी आनंदधाम येथून तेला तप आराधना करण्याची मंगल भावना व्यक्त केली आहे.

आचार्य भगवंतांच्या जन्म जयंतीच्या पावन प्रसंगी २० जुलै रोजी ५०० बालक बालिकांनी आयंबिल तपाद्वारे आनंद गुरु चरणी आपली श्रध्दा, भक्ति अर्पण केली. तीन दिवस आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषिजी म.सा., प्रबुध्द विचारक आदर्शऋषिजी म. सा., वात्सल्य मूर्ती डॉ. दर्शनप्रभाजी म.सा., विदुषी डॉ. अनुपमाजी म. सा. इत्यादी साधु साध्वीजींच्या पावन सानिध्यात उपस्थित राहून तेला तप आराधना करावी, असे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, अहिल्यानगरच्या वतीने करण्यात आले आहे. सर्व कार्यक्रमांची जय्यत तयारी करण्यात आली आहे. २५ जुलै रोजी भक्त निवास येथे गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली.

## आनंदऋषीजी जन्मजयंतीनिमित्त महावीरनगर जैन स्थानकात २७ जुलै रोजी रक्तदान व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जन्मजयंतीनिमित्त महावीरनगर चंदनमलजी सुराणा जैन स्थानकात २७ जुलै रोजी रक्तदान शिबिर व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत हे शिबीर होणार आहे, अशी माहिती महावीरनगर श्रावक संघाचे अध्यक्ष अनिल कटारिया व शिबिर प्रमुख महामंत्री अशोक बलदोटा यांनी दिली.

महावीरनगर चंदनमलजी सुराणा जैन स्थानकात अमित ज्योतिजी महाराज आदी ठाणा ४ यांचा चातुर्मास सुरू आहे. यात आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांची जन्म जयंती साजरी करण्यात येणार आहे.

रक्तदान शिबिरात आनंदऋषीजी ब्लड बँकेची टिम रक्त संकलनाचे काम पाहणार आहे. यावेळी हिमोग्लोबिन तसेच ब्लड ग्रुपचीही तपासणी करण्यात येणार आहे. सर्व रोग निदान शिबिरात आनंदऋषीजी नेत्रालयातील तज्ज्ञ डॉक्टरांची टिम नेत्र तपासणी करतील. शुगर तपासणी नमन डायग्नोस्टिकची टिम करेल. अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. संदीप सुराणा अस्थिरोग तपासणी व कॅल्शियम तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. डॉ.शरद मोहोळकर हृदयरोग व रक्तदाब तपासणी करतील. डॉ.शिल्पा नरसाळे महिला आरोग्य तपासणी करतील. डॉ.पराग गांधी दंत रोग तपासणी करतील.

शिबिरातील रूग्णांना डॉ.संजय बाफना मार्गदर्शन करणार आहे तर स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सौ. सुरपुरिया महिला आरोग्याबाबत मार्गदर्शन करतील. रूग्णांना डॉक्टरांनी सोनोग्राफी सांगितल्यास कन्स्लटंट रेडिओलॉजीस्ट डॉ.हेमा सुराणा यांच्यातर्फे सिटी केअर हॉस्पिटल येथे मोफत सोनोग्राफी तपासणी करण्यात येणार आहे. या शिबिरात रक्तदात्यांनी सहभाग नोंदवावा तसेच सर्व रोग निदान शिबिराचाही लाभ घेण्याचे आवाहन शिबीर प्रमुख महामंत्री अशोक बलदोटा यांनी केले आहे. शिबिरासाठी खजिनदार पोपट कटारिया, आनंद आशिष जाप मंडळाचे चंद्रकांत राका व सर्व सदस्य, चातुर्मास कमिटी अध्यक्ष संजय सुराणा, चातुर्मास कमिटी स्वागताध्यक्ष नरेंद्र बाफना व सर्व सदस्य, महावीरनगर, सावेडी, हडको, नागापूर, बोल्हेगाव, आशिष जाप मंडळाचे पदाधिकारी, उपनगरातील श्रावक संघ परिश्रम घेत आहेत.



नाशिक येथील सुवर्णदालन कंचनपुष्पच्या द रॉयल एक्झिबिशनला लाभत असलेला ग्राहकांचा प्रतिसाद.

## नाशिक येथील सुवर्णदालन कंचनपुष्पचे अहिल्यानगरमध्ये द रॉयल एक्झिबिशन

नगर – डायमंड व सोन्याच्या अलंकारासाठी नाशिक येथील सुवर्णदालन कंचनपुष्प गोल्ड ॲण्ड डायमंडचे प्रदर्शन द रॉयल एक्झिबिशनला, आनंदऋषिजी हॉस्पिटल समोर, आयरिस हॉटेल येथे २१ जुलै रोजी सुरूवात झाली असुन हे प्रदर्शन २३ जुलैपर्यत सुरू असणार आहे.

प्रदर्शनात आपणास चेन, ब्रेसलेट, वॉचेल, सोने तसेच हिरेच्या ज्वेलरीचे असंख्य प्रकार आपणांस प्रदर्शनात पहावयास मिळणार आहे. त्याच सोबत या प्रदर्शनात सोने व हिरेंच्या प्रत्येक खरेदीवर एक मोफत गोल्ड क्वॉईन दिले जाणार आहे. या ऑफरचा आजचा शेवटचा दिवस असल्याने अहिल्यानगरवासियांनी एकदा भेट देवून नक्की आपला फायदा करून घ्यावा असे आवाहन कंचनपुष्पचे संचालक दिनेश धोका यांनी केले आहे. अप्रतिम व कलापूर्ण सोन्याचे व हिऱ्यांचे दागिने या प्रदर्शनात उपलब्ध आहेत असे संचालक दिनेश धोका यांनी स्पष्ट केले.

यावेळी ज्योती दाभाडे, नेहा मेघानी, पेमराज बोथरा, अलोक मुनोत, संदीप थोबे, सोनाली मालु, अनघा राऊत, संगिता बोथरा, विजय भंडारी, लीना मते आदी उपस्थित होते.

## संत नामदेव महाराजांनी आपल्या कार्यातून समाजाला दिशा दिली

**सचिन जगताप यांचे प्रतिपादन; नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त डावरे गल्ली येथील शिंपी समाज उन्नती ट्रस्टच्या वतीने विविध कार्यक्रम**



श्री संत नामदेव महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त डावरे गल्ली येथील नामदेव शिंपी समाज उन्नती ट्रस्टच्यावतीने नामदेव मंदिरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – भगवंत नामाने जीवनातील दु:ख कमी होऊन आनंद निर्माण होत असतो. हेच संतांनी मनुष्याचे जीवन सुखी–समृद्ध होण्यासाठी आपल्या सत्वचनातून मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या वचनांप्रमाणे मनुष्याने वाटचाल केल्यास कोणत्याही प्रकारच्या अडचणी येत नाही. संत नामदेव महाराजांनी कार्यातून समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे. डावरे गल्ली येथील नामदेव शिंपी समाज उन्नती ट्रस्टच्यावतीने नामदेवाव मंदिरात विविध कार्यक्रमातून धार्मिक वातावरण निर्माण होत आहे. त्याचबरोबरच समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहेत, ही कौतुकास्पद बाब आहे. धार्मिक कार्यातून समाजाचे मोठे संघटन उभे राहत आहे. अशा कार्यात आपले सदैव योगदान राहील, असे प्रतिपादन गुणे शास्त्री आयुर्वेद संस्थांचे अध्यक्ष सचिन जगताप यांनी केले.

श्री संत नामदेव महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त डावरे गल्ली येथील मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कविटकर म्हणाले कि संत नामदेव महाराज यांनी जगाच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वेचले. त्यांनी सामान्यांसाठी केलेले कार्य अनमोल व महान आहे. त्यांच्या कार्याचा वारसा असाच पुढे चालू राहिला पाहिजे. याच उद्देशाने श्री नामदेव शिंपी समाज उन्नती महाराज शिंपी समाज ट्रस्टच्या माध्यमातून डावरे गली विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. जयंती व पुण्यतिथीनिमित्त सप्ताहभर धार्मिक कार्यक्रमाबरोबर सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकांचा विकास साधला जात आहे.

प्रास्तविकात सचिव अभिजित पाडळकर म्हणाले कि, श्री संत नामदेव महाराज संजीवन सोहळा निमित्त गेल्या सात दिवसांपासून या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध किर्तनकारांची किर्तने, प्रवचने, ज्ञानेश्वरी पारायण झाले. परिसरातून दिंडी मिरवणुक काढण्यात आली. महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली. या सर्व धार्मिक व सामाजिक उपक्रमांचा समाजातील बंधू – भगिनींनी लाभ घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

सूत्रसंचालन उपाध्यक्ष महेश जाधव यांनी केले तर आभार मयूर नेवासकर यांनी मानले. अध्यक्ष ज्ञानेश्वर कविटकर, उपाध्यक्ष महेश जाधव, सचिव अभिजित पाडळकर, सुजित चंडवाले, मुकुंद बगाडे, योगेश जाधव, प्रफुल जवळेकर, शोभना गीते, कल्पना जाधव, राजश्री पाडळकर, ज्ञानेश्वर पवार, दिलीप गीते,सुरेश नेवासकर,अरुण जवळेकर, अशोक जाधव, रवींद्र क्षीत्रे, रवींद्र गीते, ॲड आनंद मांढरे, शरद गीते, सुरेश चुटके, अनिल भांबुरे, नितीन गीते, उमेश गीते, किशोर देठे, अनिल चांडवले, राजेंद्र कारंजकर, अनिरुद्ध गीते, संजय गीते, डॉ. केकडे, मयूर जाधव, प्रसाद चौघुले, सचिन चुंबळकर, अनिल कांबळे, सुरेश चुंबळकर, मच्छिंद्र चांडवले, अनिल गीते, भारत चांडवले, सचिन देशमानकर, मारुती पवार आदी उपस्थित होते.

## शब्दगंध साहित्यिक परिषद मध्यवर्ती राज्यस्तरीय साहित्य संवाद संमेलनाच्या अध्यक्षपदी राजेंद्र चोभे



नगर – शब्दगंधच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या दुसऱ्या मध्यवर्ती राज्यस्तरीय साहित्य संवाद व काव्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी राजेंद्र चोभे पाटील यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड परिषदेच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत सर्वानुमते करण्यात आली. चोभे पाटील हे आठवड (ता. नगर, जि. अहिल्यानगर) येथील रहिवासी असून, ग्रामीण भागातील साहित्य क्षेत्रात सक्रीय कार्यरत आहेत.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कोहिनूर मंगल कार्यालयात अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस संस्थापक सुनील गोसावी, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, राज्य संघटक प्रा. डॉ. अशोक कानडे, प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र फंड, प्रा. डॉ. अनिल गर्जे, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, बबनराव गिरी, स्वाती ठुबे, शर्मिला गोसावी आदी उपस्थित होते. यावेळी निवड झाल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

राजेंद्र चोभे पाटील यांचे प्राथमिक शिक्षण आठवड येथे झाले असून, माध्यमिक शिक्षण चिचोंडी पाटील येथे पूर्ण झाले आहे. महाविद्यालयीन शिक्षण न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथे घेतल्यानंतर ते राहुरी कृषी विद्यापीठातील कृषी विद्या विभागात कार्यरत आहेत. त्यांनी महाराष्ट्राचा तपस्वी तेजस्वी तारा राष्ट्रसंत सद्गुरु तनपुरे बाबा यांच्या स्मरणगाथा ग्रंथाचे, तसेच 'वैकुंठवासी विठ्ठल महाराज देशमुख आळंदीकर' यांचे जीवनचरित्र प्रकाशित केले आहे. विविध वृत्तपत्रांमधून सामाजिक प्रबोधन करणारे लेखन ते सातत्याने करतात. शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र साहित्य परिषद या संस्थां मध्ये ते सक्रीय असून, ग्रामीण भागात साहित्य संस्कृती रुजवण्यासाठी त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

या बैठकीस मकरंद घोडके, प्रमोद येवले, स्वाती काळे, दिशा गोसावी, रूपचंद शिदोरे, आत्माराम शेवाळे, एम. पी. दिवाण, लक्ष्मीकांत तरोटे उपस्थित होते. सहभागी होण्यासाठी ९९ २१ ०० ९७ ५० वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आडसूळ आर्किटेक्चर महाविद्यालयास शासकीय मान्यता

नगर – कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी, लोणेरे या सर्व नियामक संस्थेकडून चास अहिल्यानगर साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेच्या आडसूळ आर्किटेक्चर कॉलेज ला शासकीय मान्यता मिळालेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ प्रवेशासाठी डी. टी. ई. कोड ५६७३ आहे. सर्व शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी आडसूळ आर्किटेक्चर कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन याचा फायदा घ्या, अशी माहिती संस्थेचे संस्थापक अनिरुद्ध आडसूळ यांनी दिली. अधिक माहितीसाठी संपर्क ७६२०००८४४२.

या महाविद्यालयाच्या उभारणीसाठी संस्थेच्या सेक्रेटरी डॉ. लीनाताई आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, संचालक कृष्णा आडसूळ, आडसूळ टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य व संचालक डॉ. प्रदीप एम पाटील, आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेजचे प्राचार्य व डायरेक्टर डॉ. संभाजी पठारे, फार्मसीचे प्राचार्य डॉ. धनंजय लांडगे, डॉ. संदेश वायाळ, आर्ट्स कॉमर्स चे प्राचार्य डॉ. प्रदीप पंडित, आडसूळ लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. रियाज बेग, तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा. रमेश गडाख, कार्यालयीन अधीक्षक सय्यद जमीर आणि रमेश नेटके यांचे सहकार्य लाभले.

## जिल्ह्यातील सर्व न्यायालयात 'राष्ट्रासाठी मध्यस्थी' विशेष मोहीम

नगर – सर्वोच्च न्यायालय व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार तडजोडसक्षम दिवाणी व फौजदारी प्रकरणांसाठी विशेष मध्यस्थी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत न्यायालयातील प्रलंबित तडजोडसक्षम प्रकरणांमध्ये कौटुंबिक वाद, मोटार अपघात, नुकसानभरपाई, चेक बाउन्स (कलम १३८) प्रकरणे, वाटपाचे दावे व वाणिज्यिक दावे यांचा समावेश असून, या प्रकरणांमध्ये मध्यस्थ प्रक्रियेचा लाभ घेता येणार असल्याची माहिती प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण तसेच मध्यस्थी व सामंजस्य प्रकल्प समिती, मुंबई उच्च न्यायालयाच्या राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली 'राष्ट्रासाठी मध्यस्थी' ही विशेष मोहीम जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये १ जुलै पासून पुढील ९० दिवसांसाठी राबविण्यात येत आहे. प्रलंबित तडजोडसक्षम प्रकरणे न्यायिक वकिल मध्यस्थांच्या समोर सुनावणीसाठी ठेवली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील ज्या पक्षकारांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत व ती प्रकरणे मध्यस्थीच्या माध्यमातून तडजोडीने मिटवण्याची ज्यांची इच्छा आहे, अशा पक्षकारांची प्रकरणे या विशेष मोहिमेंतर्गत निकाली काढण्यात येणार आहेत. या प्रक्रियेमुळे पैसा, श्रम व वेळ वाचतो तसेच सुलभ व जलद न्याय मिळतो. त्यामुळे पक्षकारांनी या संधीचा जास्तीत–जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

संबंधित पक्षकार प्रत्यक्ष किंवा आभासी पद्धतीने मध्यस्थी प्रक्रियेत सहभागी होऊ शकतील. अशा पक्षकारांनी जिल्हा किंवा तालुका न्यायालय तसेच न्यायालयाच्या आवारातील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव कृष्णा एम. सोनवणे यांनी केले आहे.

## निकाल येण्यापूर्वीच आबासाहेब काकडे शैक्षणिक समुहामधील सथ्था कॉलेज ऑफ फार्मसीचे २३ विद्यार्थी बहुराष्ट्रीय कंपनीत निवड



डॉ. शिवाजीराव काकडे

नगर – आनंदधाम रोडवरील आबासाहेब काकडे शैक्षणिक समुहाच्या एन. एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये मायलान (विआत्रीस) लॅबोरेटोरीज लिमिटेड या बहुराष्ट्रीय कंपनीतर्फे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाद्वारे अंतिम वर्षात शिकत असलेल्या २३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे यांनी प्रसारमाध्यमांमार्फत दिली. या निवड प्रक्रियेमध्ये अत्यंत काटेकोर आणि स्पर्धात्मक टप्प्यांचा समावेश होता, ज्यामध्ये लेखी चाचणी, गटचर्चा आणि वैयक्तिक मुलाखतीचा समावेश होता. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीच्या नाशिक, इंदूर व छत्रपती संभाजीनगर येथील शाखांमध्ये क्वालिटी अशुरन्स, क्वालिटी कंट्रोल व प्रॉडक्शन विभागात नोकरी देण्यात येणार आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विशाल पांडे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या उज्वल करिअरसाठी अशा स्वरूपाचे रोजगाराभिमुख उपक्रम हे अत्यंत महत्त्वाचे ठरतात. उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे तयार करण्यासाठी कॉलेज सातत्याने प्रयत्नशील आहे.

या उपक्रमासाठी मायलान (विआत्रीस) लॅबोरेटोरीज कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक रोहन कुलकर्णी, वरिष्ठ व्यवस्थापक प्रियब्रता दाश व मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक श्रीहरी कावरे यांनी विशेष प्रयत्न केले. कॉलेज प्रशासनाने या संधीबद्दल त्यांचे आभार मानले आहेत.

या रोजगार मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्रशिक्षण आणि रोजगार विभागाचे अधिकारी डॉ. जे. एस. सुर्यवंशी, डॉ. शोएब शेख आणि संबंधित सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी श्रमपूर्वक योगदान दिले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे, प्राचार्यांचे आणि सर्व प्राध्यापक वर्गाचे संस्थेचे सचिव डॉ. शिवाजीराव काकडे, हर्षदाताई काकडे, विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे, भाग्यश्रीताई काकडे पाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी अभिनंदन केले आहे.

## राहाता तालुक्यात सरपंच पदाच्या आरक्षणाची २४ जुलै रोजी सोडत

शिर्डी – तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी २०२५ ते २०३० या कालावधीतील आरक्षण सोडत २४ जुलै रोजी होणार आहे. तहसील कार्यालय, राहाता येथे दुपारी १२ वाजता ही विशेष सभा होईल, अशी माहिती तहसीलदार अमोल मोरे यांनी दिली.

ग्रामविकास विभागाच्या आदेशानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गासाठी चक्रानुक्रमाने (रोटेशन पद्धतीने) आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. यासाठी २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीचा आधार घेतला जाईल.

सर्वसाधारण सोडतीनंतर दुपारी १ वाजता महिला उमेदवारांसाठी (अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला) आरक्षण सोडत काढली जाणार आहे. ही प्रक्रिया उपविभागीय अधिकारी शिर्डी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे.

तालुक्यातील ग्रामपंचायत सदस्य, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य तसेच नागरिकांनी या सभेला उपस्थित रहावे, असे आवाहन तहसील कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

## सैनिकी वसतीगृहात तात्पुरत्या स्वरुपात पदांची भरती

नगर – सैनिकी मुला–मुलींचे वसतीगृह, अहिल्यानगर, कोपरगाव व श्रीगोंदा येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात स्वयंपाकी, सफाई कामगार व चौकीदार उमेदवाराची नियुक्ती करण्यात येणार आहे. यासाठी पात्र उमेदवारांनी २७ जुलै पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे. या पदांसाठी उमेदवाराचे वय ४५ वर्षापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. अर्जासोबत सैन्य सेवेतील डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र, आधारकार्डची छायांकित प्रत जोडावी. या पदासाठी नागरी उमेदवारही अर्ज करु शकणार आहेत. परंतू माजी सैनिकांना यामध्ये प्राधान्य दिले जाईल. मुलाखतीची तारीख स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली दुकान मिळकत विद्यमान मालक **१) सागर ब्रिजमोहन बक्षी, २) रविंद्र परमानंद बक्षी** (HUF), **३.प्रकाश भानुशंकर मेहता, ४) संजय रमेश मेहता, ५) प्रतिक उमेदराव मेहता, सर्व रा. अहमदनगर** यांचे मालकीची असून सदर दुकान मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलांशी केलेला असून विसार म्हणून मोठी रक्कम स्वीकारलेली आहे व लवकरच खरेदीखत होणार आहे. तसेच सदर दुकान मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत,असल्याचा विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर दुकान मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही **प्रकारे चालु वाद, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, कर्ज, दान, बक्षिस, पोटगी हक्क,सोसायठी राईटस व इतर कोणतेही हक्क,हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) दिवसांचे आत** खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे. जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर दुकान मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल. दिनांक २३/०७/२०२५.

**परिशिष्ट** : **१) मिळकतीचे वर्णन** :– डि. ।। अहमदनगर सब. डि.।। ता. नगर पैकी मौजे **शहरनगर** येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील रामचंद्रखुंट भागातील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|
| २१७८ | ९२७.३० चौ.मीटर |

**यावर बांधकाम केलेले मानस सरोवर अपार्टमेंट या अपार्टमेंटमधील ग्राऊंड फ्लोअरवरील दुकान नं. १३ चे क्षेत्र ३४.७१ चौ.मीटर मिळकतीमध्ये विद्यमान मालक नं.१ व २ यांचा ३३.३३ टक्के हिस्सा, विद्यमान मालक नं. ३ यांचा ३३.३४ टक्के हिस्सा व विद्यमान मालक नं. ४ व ५ यांचा ३३.३३ टक्के हिस्सा आहे.**

**यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे** –

पुर्वेस – करशेटजी रोड, दक्षिणेस – शॉप नं. १२

पश्चिमेस – शॉप नं ७, उत्तरेस – बन्सीमहाराज मिठाईवाला यांची मिळकत

**ॲड.सय्यद अशफाक अहमद**

बी–७, उजाला अपार्टमेंट, सी.एन.हाईट, युनियन बँक ऑफ इंडियाशेजारी, गुलमोहररोड, सावेडी,अहमदनगर–४१४००३

मो : 9822024038, 9028220616

दि.२३/०७/२०२५

अहिल्यानगर



### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **१) श्री. हिमेश दिलीप पोरवाल २) प्रतिक्षा हिमेश पोरवाल ३) अनिता दिलीप पोरवाल सर्व रा. प्लॉट नं के–३, कमलीनी पॅलेस, गणेशवाडी, स्टेशन रोड, अहिल्यानगर.** यांचे मालकी वहिवाटीचा असून यांनी सदर मिळकतीचे विक्री करण्याचा करार आमचे अशिलांबरोबर करण्याचे ठरविले असून सदर मिळकतीबाबत आमचे अशिलाबरोबर केलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटिसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर शॉप विक्री पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** –डि ।। अहिल्यानगर सब. डि.।। ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **सावेडी** येथील अहिल्यानगर भागातील मे.दु.निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कक्षेतील शॉप मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| टि.पी. स्किम नं. | फायनल प्लॉट नं. | चौ.मी |
|---|---|---|
| ४ | १७८/१ | ८८०.१० |

**यावर बांधलेल्या इमारतीचे नाव उषादेवी डोके टॉवर यापैकी ग्राउंड फ्लोअरवरील शॉप नं.२ याचे कारपेट क्षेत्रफळ ६७.८५ चौ.मी. बिल्टअप क्षेत्रफळ ७२.४६ चौ.मी. या शॉप मिळकती बाबत.**

**यांसी चतु:सिमा** –

पुर्वेस – स्टेअरकेस, टॉयलेट, दक्षिणेस – मार्जिनल स्पेस व लागू प्लॉट

पश्चिमेस – ३० मी. रस्ता व मार्जिन, उत्तरेस – शॉप नं. १

**ॲड.संदीप नामदेव भोगाडे**

एम.ए.,एल.एल.बी.,स्टेट बँक चौक, अहमदनगर–४१४००१

मो : 9420335535, 8208730700

दि. २३/०७/२०२५

अहिल्यानगर.

# एक फोन आला आणि...

जयपूरमधील पंचतारांकित हॉटेलमध्ये लग्नाची जोरदार तयारी सुरू होती. बँडच्या तालावर वऱ्हाडी नाचत होते. पंडीत लग्नाचे मंत्र म्हणत होते. वधू वर सप्तपदीसाठी आले अन् तेवढ्यात वराला फोन आला. त्यानंतर वधूला मंडपातच सोडून वराने धूम ठोकली.

गेल्या अनेक दिवसांपासून अंमलबजावणी संचालनालय (ईडी) वराच्या शोधात होते. प्रसिद्ध महादेव बेटिंग ॲप प्रकरणातील सौरभ आहुजा म्हणजेच हा वर होता. 'ईडी'ला आरोपी सौरभ गुप्तपणे लग्न करत असल्याचे कळले होते. ही माहिती मिळतातच त्याला पकडण्यासाठी 'ईडी'ने योजना आखली. लग्नाच्या दिवशी छापा टाकून सौरभ आहुजाला पकडण्याचे ठरले.' ईडी'ला लग्नाच्या विधींनंतर सौरभ आहुजाला पकडायचे होते. पण सौरभला 'ईडी'च्या योजनेबद्दल कळले. 'ईडी'च्या तावडीत सापडण्यापूर्वी सौरभ मध्येच मंडपातून वधूला सोडून पळून गेला.

लग्नाच्या विधींपूर्वी सौरभ पळून गेल्याने त्याची वधू आणि इतर पाहुणे आश्चर्यचकित झाले. त्यांना नेमके काय घडले याबद्दल काही समजत नव्हते; पण 'ईडी'ने लग्नाला आलेल्या त्याच प्रकरणातील आरोपी प्रणवेंद्रसह तीन जणांना पकडताच सर्वांना या प्रकरणाची माहिती समजली आणि सौरभबद्दल सगळे सत्य समोर आले. नंतर 'ईडी' अधिकाऱ्यांनी वधूचीही चौकशी केली; पण त्यांच्या हाती काही लागले नाही. एवढेच नाही तर 'ईडी'ने वधू आणि वर दोघांच्याही कुटुंबांकडून माहिती गोळा केली असून ते सौरभच्या शोधात आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, भारतातील सर्वात मोठ्या ऑनलाइन बेटिंग प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या महादेव बेटिंग ॲपद्वारे कोट्यवधी रुपयांच्या बेकायदेशीर व्यवहारासंदर्भात रायपूर अंमलबजावणी संचालनालयाचे पथक जयपूरला पोहोचले होते. तिथे त्यांनी आरोपी सौरभ आहुजा याला पकडण्यासाठी छापा टाकला; पण 'ईडी' अधिकाऱ्यांना चुकवून आरोपीने मंडपातून पळ काढला. भोपाळचा रहिवासी असलेल्या आरोपी सौरभ आहुजाच्या कुटुंबाने रायपूरमधील मुख्य आरोपीच्या दुबईतील लग्नाच्या पार्टीसाठी विमान बुक करण्यात भूमिका बजावली. त्यानंतर रायपूर 'ईडी'ची टीम सौरभ आहुजाच्या मागे लागली. पण 'ईडी'ला सौरभ स्वतःच्या लग्नासाठी जयपूरला पोहोचला असल्याची माहिती मिळाली तेव्हा 'ईडी'चे अधिकारीही त्याच्या मागे लागले. यानंतर 'ईडी'चे अधिकारी पूर्ण तयारीने आहुजा कुटुंब जिथे राहत असलेल्या हॉटेलमध्ये पोहोचले. तरीही सौरभने 'ईडी' अधिकाऱ्यांना चकवा दिला. पण 'ईडी'ने इतर तीन आरोपींना अटक केली असून त्यांना विमानाने रायपूरला नेले आहे.

# कॅलिडोस्कोप

## आधी मारले, मग जावई बनवले !

मध्यरात्रीची वेळ होती. एका तरुणाने चोरून घरात प्रवेश केला. अचानक दिवे लागले आणि घरातील लोक जागे झाले. त्या तरुणाला पाहताच त्यांनी 'चोर-चोर' असे ओरडून त्याला मारहाण केली. तो तरुण म्हणू लागला, 'एकदा माझे ऐका.' मग त्याने स्वतःबद्दल असे काही सांगितले, की दुसऱ्या दिवशी सकाळी कुटुंबाने त्याला त्यांचा जावई बनवले. आता या लग्नाची सर्वत्र चर्चा होत आहे.

ही घटना उत्तर प्रदेशातील जौनपूर येथील आहे. खरे तर ज्या घरात तो तरुण शिरला होता तिथे त्याची मैत्रीण राहत होती. तो मध्यरात्री त्याच्या प्रेयसीला भेटण्यासाठी पोहोचला होता. पण नशीब वाईट होते. प्रेयसीच्या कुटुंबाने त्याला चोर समजून मारहाण केली. नंतर मुलाने खरे सांगितले तेव्हा दुसऱ्या दिवशी



कुटुंबाने त्याचे लग्न त्यांच्या मुलीशी लावून दिले. ही विचित्र घटना जसरापाटन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील करीमपूर खुर्द गावातील आहे. पनौली गावात राहणारा विकास पासवान प्रेयसी रुबीच्या घरात तिला भेटण्यासाठी गुप्तपणे शिरला. रात्रीच्या अंधारात त्याला कोणीतरी पाहिले, चोर समजून आरडाओरडा केला. घरातील लोकही जागे झाले. त्यानंतर सर्वांनी मिळून विकासला पकडले आणि मारहाण केली.

पकडल्यानंतर तरुणाची चौकशी केली असता तो विकास पासवान असल्याचे समजले. तरुणाने आपण चोर नसून रुबीला भेटायला आल्याचे संगीतले. रुबीने तो आपला प्रियकर असल्याचे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांचे लग्न झाले. आता या लग्नाची सर्वत्र चर्चा होत आहे.



## गर्लफ्रेंड चक्क भाड्याने!

आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धेच्या युगात जगदेखील झपाट्याने बदलत आहे. आजच्या डिजिटल युगात नात्यांची व्याख्यादेखील बदलू लागली आहे. काही देशांमध्ये गर्लफ्रेंड भाड्याने मिळते. एवढेच नाही, तर यासाठी अनेक देशांमध्ये ऑनलाईन प्लॅटफॉर्म्सदेखील आहे. त्यावर काही प्रक्रिया पूर्ण करून भाड्याने गर्लफ्रेंड मिळवू शकता. यामागचे कारणदेखील हैराण करणारे आहे.

भाड्याने गर्लफ्रेंड ही संकल्पना जपानमधून सुरू झाली; पण आज चीन, दक्षिण कोरिया आणि थायलंडसारख्या आशियाई देशांमध्ये भाड्याने गर्लफ्रेंड ही संकल्पना खूप प्रसिद्ध आणि सामान्य झाली आहे. या देशांमध्ये, तुम्ही वेगवेगळ्या ॲप्सद्वारे तुमच्या आवडीनुसार काही काळासाठी भाड्याने गर्लफ्रेंड बुक करू शकता. या गर्लफ्रेंड पूर्णपणे प्रोफेशनल असतात. सुरुवातीला ही सेवा जपानमधील काही कंपन्यांनी सुरू केली होती. या कंपन्या ग्राहकांसोबत वेळ घालवणाऱ्या प्रोफेशनल मुलींना प्रशिक्षण देतात. यामध्ये फक्त सामाजिक संवादाची सुविधा दिली जाते. म्हणजे गर्लफ्रेंड ग्राहकासोबत डिनर डेट, कौटुंबिक कार्यक्रम, सिनेमा पाहणे, शॉपिंग करणे फिरायला जाणे किंवा फक्त गप्पांपर्यंत मर्यादित होत्या.


ग्राहक थेट ॲपवर जाऊन या मुलींचे फोटो, आवडी-निवडी, सवयी आणि भाषेच्या आधारे स्वतःसाठी टेंपरेरी गर्लफ्रेंड निवडू शकतात. यानंतर, एक वेळ बुक केली जाते आणि मुलगी त्या निश्चित वेळी क्लायंटला भेटते. मुलीचा अनुभव आणि तुम्ही कोणत्या उद्देशाने गर्लफ्रेंड बुक करत आहात, हे लक्षात घेऊन भाडे ठरवले जाते. मिळालेल्या माहितीनुसार, भाड्याच्या गर्लफ्रेंडसाठी एका तासासाठी ग्राहकाला चार हजार येन म्हणजे दोन हजार ५०९ रुपये मोजावे लागतात, तर क्लायंटला प्रवास, चित्रपट तिकिटे, जेवण आणि पेये यासारख्या सुविधांच्या खर्चासाठी वेगळे पैसे द्यावे लागतात.

जपान आणि चीनसारख्या देशांमधील लोक एकाकीपणा, ब्रेकअप किंवा तणावाच्या वेळी स्वतःला बरे वाटण्यासाठी या सेवेचा वापर करतात, तर काही व्यक्ती कुटुंब आणि नातेवाइकांच्या दबावामुळे असे करतात. लग्नापासून दूर पळण्यासाठीदेखील भाड्याच्या गर्लफ्रेंडचा पर्याय स्वीकारला जातो. गर्लफ्रेंला भाड्याने घेण्याची ही पद्धत योग्य आहे की नाही यावर लोकांची वेगवेगळी मते असू शकतात.

## रोबो बोलतो १०० भाषा

सध्याचा जमाना रोबोंचा आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेले बरेच रोबो लक्षवेधी ठरत आहेत. 'सोफिया' नावाच्या रोबोला सौदी अरेबियाने नागरिकत्त्व बहाल केलं आहे. असे अनेक रोबो चर्चेचा विषय ठरत असतात. इराणमधल्या तेहरान विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी असाच एक अनोखा रोबो तयार केला आहे. 'सुरेना' असं या रोबोचं नाव आहे. 'सुरेना'चं वजन ७० किलो तर उंची १७० सेंटीमीटर आहे. 'सुरेना'ला एक, दोन नाही तर १०० भाषा ज्ञात आहेत. म्हणजेच हा रोबो १०० भाषांमध्ये लोकांशी संवाद साधू शकतो. इतकंच नाही, तर तो १०० प्रकारच्या वस्तू ओळखू शकतो. त्याला माणसाचे चेहरेही ओळखता येतात. 'सुरेना' या भाषांचा अनुवादही करू शकतो. 'सुरेना' फुटबॉलही खेळू शकतो. तो बॉलला किकही मारू शकतो. या विद्यापीठातल्या इंजिनिअरींग विभागाने चार वर्षांच्या मेहनतीने हा रोबो तयार केला आहे. हा रोबो हस्तांदोलनही करू शकतो. 'सुरेना' एका तासात ७०० मीटर चालू शकतो.





## वीजनिर्मिती करणारा मासा

या जगात विविध प्रजातींचे जीव-जंतू आहेत. प्रत्येकाचं काही ना काही वैशिष्ट्य आहे, काही ना काही गुणधर्म आहेत. कोणी जलद धावतं, कोणी उलटं उडू शकतं तर कोणी रात्रीच्या अंधारातही बघू शकतं. मात्र एका माशाचं वैशिष्ट्य ऐकून कोणीही चाट पडेल! हा मासा विजेची निर्मिती करतो. अमेरिकेतल्या टेनेस्सी राज्यातल्या चट्टानूगा मत्स्यालयात हा मासा ठेवण्यात आला आहे.

या माशापासून तयार होणाऱ्या विजेमुळे मत्स्यालयातलं ख्रिसमस ट्रीही उजळतं. इलेक्ट्रिक ईल असं या माशाचं नाव आहे. सध्या हा मासा सोशल मीडियावर बराच लोकप्रिय ठरला आहे. ख्रिसमसच्या निमित्ताने या मत्स्यालयात एक ख्रिसमस ट्री ठेवण्यात आलं आहे. त्यावर रोषणाई करण्यात आली आहे. इलेक्ट्रिक ईलच्या शरीरातल्या ऊर्जेमुळे या ट्रीवर लावण्यात आलेल्या इलेक्ट्रिकच्या माळा प्रकाशित होतात. या मत्स्यालयात सेन्सर बसवण्यात आले आहेत.

या सेन्सर्सच्या मदतीने इलेक्ट्रिक ईलने तयार केलेली वीज ख्रिसमस ट्रीपर्यंत पोहोचते आणि हा ट्री दिव्यांनी उजळून निघतो. उत्तेजित झालेला किंवा अन्नाच्या शोधात असताना हा मासा विजेची निर्मिती करतो. या माशाचा हा गुण म्हणजे निसर्गाचा चमत्कारच म्हणायला हवा.


## रशियन तरुणी बनली भारतीय

बिहारमधील कटिहार येथील एक खास प्रेमकहाणी सध्या 'सोशल मीडिया'वर ट्रेंड होत आहे. रशियातील डॉ. अनुभव शाश्वत आणि अनास्तासिया यांच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडीओ इंटरनेटवर सर्वत्र चर्चेत आहेत. कटिहारच्या दुर्गा मंदिरात पारंपारिक हिंदू विधींनी पार पडलेला हा विवाह संपूर्ण देशात चर्चेचा विषय बनला आहे.



रशियातील रहिवासी अनास्तासियाने पूर्ण भक्तीने सात फेरे घेतले, कपाळावर टिकली लावली. साडी नेसली आणि हातावर मेंदीही लावली. डॉ. अनुभव शाश्वत यांची २०२० मध्ये रशियामध्ये अनास्तासियाशी भेट झाली. अनुभव तिथे वैद्यकशास्त्राचे शिक्षण घेत होता आणि नंतर कोविडच्या काळात दोघांची मैत्री झाली. हळूहळू ही मैत्री प्रेमात बदलली आणि नंतर पाच वर्षांच्या दीर्घ नात्यानंतर दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. अनास्तासियाला भारतीय संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी अनुभवने तिला भारतात बोलावले. दिल्लीत राहून तिने तिथल्या परंपरा आणि भाषा शिकली आणि ती पूर्ण स्वीकारली. यामुळेच लग्नाच्या दिवशी मंदिरात सर्व विधी पार पडले तेव्हा ती अगदी भारतीय वधूसारखीच दिसत होती.

अनुभवच्या पालकांनीही हे नाते खुल्या मनाने स्वीकारले आणि आज त्यांना त्यांच्या परदेशी सुनेचा खूप अभिमान वाटत आहे. या लग्नाची परिसरातही खूप चर्चा होत आहे. 'सोशल मीडिया'वर मोठ्या संख्येने लोक नवविवाहित जोडप्याचे अभिनंदन करत आहेत.




## पृथ्वीवरची सर्वात खोल जागा

कॅलिफोर्निया विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी अंटार्क्टिकाच्या डेनमान ग्लॅशियरजवळच्या जमिनीवर जगातली सर्वात खोल जागा शोधण्यात आली आहे. ही जागा समुद्रसपाटीपासून ३.५ किलोमीटर म्हणजेच ११,५०० फूट खोल आहे. अंटार्क्टिका खंडावर अनेक गुपितं दडली आहेत. ही गुपितं शास्त्रज्ञांनाही गोंधळात टाकतात, आश्चर्यचकित करतात. या प्रकल्पावर गेल्या सहा वर्षांपासून काम सुरू आहे. डेनमान ग्लॅशियर २० किलोमीटर रुंद आहे. या शोधातून जागतिक तापमानवाढीचे परिणाम समोर येत आहेत. बर्फ समुद्रसपाटीपासून ३५०० मीटर पेक्षाही खाली जाऊ लागला आहे. त्यामुळे येत्या काळात दक्षिण ध्रुवावर वेगळं चित्र पहायला मिळू शकतं. शास्त्रज्ञांनी शोधलेलं स्थान या पृथ्वीवरची सर्वात खोल जागा आहे. मात्र या जगातली सर्वात खोल जागा पॅसिफिक महासागराच्या पश्चिम भागात आहे. या भागाला 'मारियाना ट्रेंच' असं म्हटली जाते.

## कुत्रा होता म्हणून...

हिमाचल प्रदेशात पावसाचा जोर कायम असून भूस्खलन, पूर आणि ढगफुटी अशा घटना घडत आहेत. सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत झाले असताना अनेक ठिकाणी लोकांना डोक्यावरील छप्पर गमवावे लागले आहे. मात्र मंडी जिल्ह्यातील एका गावात






कुत्र्याने भुंकून धोक्याची घंटा वाजवली आणि वीस कुटुंबातील ६७ जणांचा जीव वाचवला.

मंडीच्या धरमपूर भागातील सियाठी गाव ढिगाऱ्यात अडकले. सियाठी येथील रहिवासी नरेंद्र यांनी सांगितले, कुत्रा घराच्या दुसऱ्या मजल्यावर झोपला होता. सतत पाऊस पडत असल्याने रात्री अचानक तो जोरजोरात भुंकू लागला. त्याच्या भुंकण्याच्या आवाजाने मला जाग आली. मला भिंतीमध्ये मोठी भेग पडल्याचे दिसले. त्यातून पाणी येत होते. मी कुत्र्यासह खालच्या मजल्यावर धावत गेलो आणि सर्वांना उठवले.

नरेंद्र यांनी नंतर गावातील इतर ग्रामस्थांनाही जागे केले आणि सुरक्षित ठिकाणी धाव घेण्याचे आवाहन केले. पाऊस इतका जोरात होता की लोक सर्व काही मागे सोडून धावत सुटले. यानंतर काही वेळातच भूस्खलन झाले आणि त्यात डझनभरापेक्षा जास्त घरे गाडली गेली. गावातील फक्त चार ते पाच घरे आता दिसत आहेत. इतर सर्व घरे आता भूस्खलनाच्या ढिगाऱ्याखाली आहेत. बचावलेल्या लोकांनी गेल्या दहा दिवसांपासून त्र्यंबळा गावात बांधलेल्या नैना देवी मंदिरात आश्रय घेतला आहे. दरम्यान या दुर्घटनेमुळे अनेक गावकरी रक्तदाब आणि नैराश्याने ग्रस्त आहेत. या दुर्घटनेनंतर इतर गावातील लोकांनी मदतीचा हात पुढे केला असून सरकारही मदत करत आहे.

## सौदी अरेबियातलं सुनसान शहर

अरबस्थानातला बराचसा भूभाग वाळवंटी आहे. या भागात इस्लाम धर्माचा प्रभाव आहे. या देशांमधले बहुसंख्य लोक इस्लामचे अनुयायी आहेत. मात्र इस्लामचा इतिहास फार जुना नाही. इस्लामच्या प्रभावाआधी या भागात इतर धर्म तसंच संस्कृती गुण्यागोविंदाने नांदत असत. यापैकीच एक संस्कृती म्हणजे नेबेतियन संस्कृती. सौदी अरेबियापासून पॅलेस्टाईनमधल्या गाझापट्टीपर्यंत नेबेतियन संस्कृतीचा प्रभाव होता. नेबेतियन लोक वाळूतून पाणी काढणं आणि त्याच्या संरक्षणाचं काम करत असत. भारत आणि पूर्व आशियातून युरोपमध्ये मसाल्यांची ने-आण होत असे. नेबेतियन



लोक मसाला व्यापाऱ्यांकडून कर वसूल करत असत. अरबी देशांमध्ये आजही नेबेतियन संस्कृतीच्या खुणा आढळतात. त्या काळातली शहरं, वाडे तसंच इतर इमारतींचे अवशेष या भागात आजही पहायला मिळतात. जॉर्डन पेत्रा शहर खूपच प्रसिद्ध आहे. सौदी अरेबियातल्या मदैन सालेह या शहरात नेबेतियन संस्कृतीच्या खुणा आहेत. हे नेबेतियन संस्कृतीच्या काळातलं दुसऱ्या क्रमांकाचं सर्वात मोठं शहर होतं. युनेस्कोने या स्थानाला जागतिक वारसा यादीत स्थान दिलं आहे. हे शहर बिगरइस्लामी लोकांनी वसवलं होतं. आज या भागात कोणीही फिरकत नाही. मदैन सालेहच्या देदीप्यमान इतिहासाची ग्वाही देणाऱ्या इतिहासाच्या खुणा आजही इथे पहायला मिळतात. एके काळी गजबजलेलं हे शहर आज अगदीच सुनसान भासू लागलं आहे.

# किरण काळे यांच्यावर दाखल गुन्ह्याचा तपास निपक्ष करावा

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे मागणी

नगर – शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख किरण काळे यांना महिलेवरील अत्याचाराच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली असून न्यायालयात त्यांना हजर केले असता पुढील तपासासाठी त्यांना पोलीस कोठडी देण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाची निपक्ष चौकशी करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष अभिषेक कळमकर यांनी केली.



किरण काळे यांच्यावर दाखल गुन्ह्याचा तपास निपक्ष करावा, या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे जिल्हा पोलीस अधीक्षकांना देण्यात आले.

यावेळी अभिषेक कळमकर म्हणाले की किरण काळे मागीलदहा ते बारा वर्षापासून शहराच्या राजकारणात सक्रिय असून शहरातील भ्रष्टाचार सर्वसामान्य वरील होणाऱ्या अन्याय विरोधात त्यांनी नेहमीच आवाज उठवला आहे. नुकताच त्यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेतील विकास कामांच्या भ्रष्टाचार विरोधात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांच्यामार्फत चौकशीची मागणी केली आहे. काळे हे एका प्रमुख राजकीय पक्षाचे पदाधिकारी असल्यामुळे त्यांना अनेक सर्वसामान्य नागरिक त्यांच्याकडे न्याय मिळत असल्याने त्यांना भेटत असतात. अशावेळी त्यांच्या विरोधात अचानक एका महिलेकडून अत्याचाराचा गुन्हा दाखल होतो व त्यांना मध्यरात्री अटक केली जाते यामध्ये काही राजकीय षडयंत्र तर नाही ना या दृष्टिकोनातूनही पोलिसांनी तपास करावा, अशी मागणी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी महिला शहराध्यक्ष नलिनी गायकवाड, युवती समन्वयक खुशी जाधव, युवक शहराध्यक्ष रोहन शेलार, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष भीमराज कराळे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अत्तर खान, शहराध्यक्ष अल्तमश जरीवाला, निलेश मालपाणी, चंद्रकांत उजागरे, समीर पठाण, अनिस शेख आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# किरण काळे यांच्यावर गुन्हा दाखल करणाऱ्या पीडितेला पोलीस संरक्षण द्यावे

नगर – शिवसेनेचे शहरप्रमुख किरण काळे यांच्यावर एका महिलेने अत्याचार केल्याप्रकरणी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केल्यानंतर त्यांना पोलीसांनी सोमवारी रात्री उशीरा अटक केली. २२ जुलै रोजी पवन भिंगारदिवे व पिडीत महिलेच्या कुटुंबीयांनी पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांची भेट घेऊन पोलीस संरक्षण मिळण्याची मागणी केली. तर राजकीय दबावाला बळी न पडता एका पिडीत महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या कारवाईबद्दल पोलीस प्रशासनाचे आभार मानले.



किरण काळे यांच्यावर गुन्हा दाखल करणाऱ्या पीडितेला पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी पवन भिंगारदिवे व पिडीत महिलेच्या कुटुंबीयांनी पोलीस उपाधीक्षक अमोल भारती यांच्याकडे केली.

किरण काळे यांनी एका पीडित महिलेचा वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी त्यांच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर महिलेने पवन भिंगारदिवे यांच्याकडे झालेल्या अत्याचाराबाबत माहिती देऊन मदत मागितली. भिंगारदिवे यांनी त्या महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी पीडितेला कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये घेऊन जाऊन पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांची मदत घेतली व किरण काळे यांच्यावर सदर महिलेच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीसांनी त्यांना रात्रीच अटक केली. मात्र आरोपी हे एका राजकीय पक्षाचे पदाधिकारी व गुंड प्रवृत्तीचे असल्याने त्यांच्याकडून जीविताला धोका असल्याचा आरोप करुन पवन भिंगारदिवे यांनी स्वत:सह पिडीत महिलेला पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. तर शिवसेनेचे संजय राऊत हा गुन्हा खोटा असल्याचे सांगत आहे. मात्र त्यांनी एका पीडित महिलेवर अत्याचार झालेला असताना एका आरोपीची पाठराखण करु नये. ते एक मोठे राजकारणी असून त्यांनी उलट पीडित महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेऊन स्वत:च्या पक्षाच्या बलात्काराचा गुन्हा असलेल्या पदाधिकारीला कठोर शासन होण्यासाठी प्रयत्न करावे. गुन्हा खोटा असता, तर पोलीसांनी तो दाखल करुन घेतला नसता. महिलेच्या आरोपामध्ये तथ्य असल्याने हा गुन्हा दाखल झाला असल्याचे भिंगारदिवे यांनी म्हटले आहे.

# भ्रष्टाचारमुक्त महापालिका करून 'शिवसेनेचाच महापौर' करणार

नगर – अहिल्यानगर महापालिकेवर दोन वर्षापासून प्रशासक असल्यामुळे नागरिकांचे मूलभूत प्रश्न वेळेवर मार्गी लागत नाही, शहरामध्ये स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला असून रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी कचऱ्याचे मोठ-मोठे ढिगारे पाहायला मिळत आहे. घंटागाडी आठ-आठ दिवस नागरिकांच्या घरी कचरा संकलनासाठी येत नाही. नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नाही, १५ वर्षा पासून फेज टू योजनेचे काम सुरू आहे अजून देखील काही उपनगरामध्ये काही ठिकाणी नागरिकांना नळाद्वारे पाणी मिळत नाही. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्वांना नळाद्वारे पाणी देण्याची घोषणा करत आहे, मात्र प्रशासक योजनांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करत असतात. नगर महापालिकेतील नगररचना विभागाचा सावळा गोंधळ नगरकरांनी अनुभवला आहे, नागरिकांनी जर बांधण्यासाठी महापालिकेकडे मंजुरीसाठी फाईल दिली जाते मात्र ती वेळेवर होत नाही, एकीकडे महापालिकेच्या शाळा बंद पडत



बाबू टायरवाले

आहे, सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहे, अमृत भुयारी गटात योजना अजून पर्यंत सुरू झाली नाही, कोट्यावधी रुपये खर्च करूनही योजना यशस्वी होताना दिसत नाही. या कामाकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष असून फक्त भ्रष्टाचार सुरू आहे. नगर शहरातील नागरिकांनी चांगले काम करणाऱ्याच्या पाठीमागे उभे राहावे हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने आम्ही काम करत असून आगामी निवडणुकीत महापालिका भ्रष्टाचार मुक्त करण्यासाठी शिवसेनेचा महापौर करणार, तसेच जिल्ह्यात जल जीवन पाणी योजनेसाठी केंद्र सरकारने मोठा निधी दिला होता मात्र कोणत्याही गावात ही योजना यशस्वी झालेली दिसत नाही. या योजनेत ठेकेदार अधिकारी संगनमताने भ्रष्टाचार केला आहे. त्यामुळे हि योजना कार्यान्वित होणार नसून नागरिक पाण्यापासून वंचित राहणार आहे अशी माहिती जिल्हाप्रमुख बाबु टायरवाले यांनी दिली.

# जमिनीचा शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाला नाही तर आंदोलन

## जिल्हाधिकाऱ्यांना ग्रामस्थ आणि मनसेच्या वतीने निवेदन

नगर – नगर-करमाळा-टेंभुर्णी या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ च्या कामासाठी श्री क्षेत्र मांदळी (ता. कर्जत) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या. मात्र या जमिनींचा मोबदला अद्याप शेतकऱ्यांना मिळालेला नाही. शासनाने दिलेला मोबदला अपुरा असून बाजारभावाच्या तुलनेत खूपच कमी आहे. या संदर्भात गावकऱ्यांच्या वतीने तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की मांदळी परिसरातील जमिनीचे बाजारभाव सुमारे १३ लाख रुपये प्रति गुंठा असून शासनाने केवळ १ लाख १६ हजार रुपये प्रति गुंठा मोबदला जाहीर केला आहे. अनेक शेतकऱ्यांना अद्याप एक रुपयाही मोबदला मिळालेला नाही. शेजारील गावांमध्ये अधिक दराने मोबदला देण्यात आला असताना मांदळी गावाची अक्षम्यपणे उपेक्षा करण्यात आली आहे.



श्री क्षेत्र मांदळी येथील शेतकऱ्यांना महामार्गासाठी संपादित जमिनीचा योग्य मोबदला मिळालाच नाही; जिल्हाधिकाऱ्यांना ग्रामस्थ आणि मनसेच्या वतीने निवेदन आले. यावेळी शहर अध्यक्ष गजेंद्र राशिनकर, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, शहर उपाध्यक्ष संकेत व्यवहारे, मनसे कर्जत तालुका अध्यक्ष सचिन सटाले आदी.

गावकऱ्यांच्या वतीने अर्ज सादर करणाऱ्यांमध्ये मनसे कर्जत तालुकाध्यक्ष सचिन हनुमंत सटाले, राजेंद्र जगन्नाथ गांगर्डे, रामदास बाबुराव भुजबळ, नीलकंठ नानुरात शुजबळ, रमेश बाबुराव भुजबळ, सौ. पार्वतीबाई जगन्नाथ गांगर्डे, राजेंद्र बाबुराव शिंदे, साजीराव बाबुराव शिंदे, भाऊसाहेब निवृत्ती गांगर्डे, संपत सकट, नामदेव मास्ता गांगर्डे, जनार्दन किसन शिंदे, लक्ष्मण किसन शिंदे, रघुनाथ हरिभाऊ गांगर्डे, शेख हजजू शब्बीर, बबन बाजीराव वाघ, भाऊ उल्हारे यांचा समावेश आहे.

या निवेदनावेळी शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, शहर उपाध्यक्ष संकेत व्यवहारे हे पदाधिकारी देखील उपस्थित होते. त्यांनीही शेतकऱ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

गजेंद्र राशिनकर यांनी यावेळी सांगितले की, शेतकऱ्यांच्या जमिनी महामार्गासाठी घेऊन त्यांना योग्य मोबदला दिला जात नाही, हे अन्यायकारक आहे. अन्य गावांमध्ये ५५० ते १२०० रुपये प्रति चौ.मी. दराने मोबदला मिळत असताना मांदळीतील शेतकऱ्यांना दुय्यम वागणूक दिली जात आहे. ही गोष्ट खपवून घेतली जाणार नाही. जर त्वरित कार्यवाही झाली नाही, तर मनसेच्या वतीने महामार्गावर तीव्र आंदोलन छेडले जाईल.

गावकऱ्यांनी स्पष्ट सांगितले की, शेजारील गांडली, थेरगाव, मिरजगाव, बनपिंप्री, घोगरगड, माडवगण आदी गावांना २९० ते १२०० रुपये प्रति चौ.मी. दराने मोबदला मिळालेला आहे. मात्र श्री क्षेत्र मांदळी गावाची आर्थिक आणि धार्मिक महत्त्व असूनही दखल घेतली जात नाही.

शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, तातडीने योग्य दराने मोबदला जाहीर करून संबंधितांना रक्कम अदा करण्यात यावी. अन्यथा संपूर्ण गावकरी महामार्ग रोख आंदोलन करण्यास भाग पडतील, असा इशारा यावेळी देण्यात आला.

# अपघातप्रवण ठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या सूचना; जिल्हा रस्ते सुरक्षा समितीची आढावा बैठक

नगर – जिल्ह्यातील अपघातप्रवण ठिकाणी संबंधित विभागांनी समन्वय साधून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, विनापरवानगी उभारलेले गतीरोधक तत्काळ काढावेत आणि अधिकृत थांब्यांवरच वाहने थांबवण्याची व्यवस्था करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.



जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना देताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या आढावा बैठकीत त्यांनी या सूचना दिल्या. बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव, एस. आर. वर्पे, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी पवन टेंभुर्णे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, वसंत पंदरकर, अभिजित पोटे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले, ''वारंवार अपघात होणाऱ्या ठिकाणी विशेष लक्ष देऊन ड्रंक अ‍ॅण्ड ड्राईव्ह, रिफ्लेक्टर, हेल्मेट आदींची तपासणी करावी. अपघातस्थळी पोलीस, सार्वजनिक बांधकाम व परिवहन विभाग यांनी संयुक्तपणे पाहणी करून अपघातांचे विश्लेषण करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. ब्लॅकस्पॉटवरील अपघातांची माहिती घेऊन तेथे सुधारणा कराव्यात.''

''अनेकदा अनधिकृत थांब्यावर बस थांबवल्या जातात, परिणामी अपघात होतात. यासाठी अधिकृत थांब्यांवरच बस थांबतील, याची दक्षता घ्यावी. प्रत्येक बसमध्ये तक्रार क्रमांक प्रदर्शित करावा,'' अशाही सूचना त्यांनी दिल्या.

''जिल्ह्यात अनेक ठिकाणी विनापरवानगी गतीरोधक उभारण्यात आले आहेत. या गतीरोधकांमुळे अनेकदा अपघात होतात. त्यामुळे ते काढून टाकावेत व आवश्यकतेनुसारच गतीरोधक ठेवावेत. गतीरोधकांच्या ठिकाणी रिफ्लेक्टर व सूचना फलक बसवावेत. बीओटी तत्त्वावरील रस्त्यांच्या दुरुस्त्यांची जबाबदारी संबंधित कंत्राटदारांची आहे. आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्त्या करण्याच्या सूचना संबंधित कंत्राटदारांना द्याव्यात,'' असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये खरीप सरासरी ९२%

## पिक विमा योजनेचे फॉर्म भरण्याची ३१ जुलै शेवटची तारीख असल्याने फॉर्म भरण्याचे आवाहन

नगर – जिल्ह्यामध्ये खरीप २०२५ दरम्यान सरासरी ९२% क्षेत्रावर पेरणी झालेली आहे. यामध्ये काही प्रमुख पिके आहेत त्यात साधारणपणे कापूस दीड लाख हेक्टर, सोयाबीन दीड लाख हेक्टर तसेच सध्या मका पिकाखालील क्षेत्र देखील वाढत आहे. व त्यात ९० हजार हेक्टर एक क्षेत्र आहे. बाजरी, मूग, तूर, उडीद यासारख्या पिकांची देखील पेरणी आपल्याकडे झालेली आहे.

अकोले तालुक्यात दुबार पेरणी ची प्रक्रिया सुरू असून साधारणपणे १५ हजार हेक्टर इतक्या क्षेत्रावर याची लागवड होईल असा अंदाज आहे. अशा पद्धतीने एकंदरीत सर्व पिकांची परिस्थिती आहे परंतु मागील दहा ते पंधरा दिवसापासून पर्जन्यमान खूपच कमी झाल्याने पिके कोमेजू लागले आहेत याला अनुसरूनच कृषी विभागाच्या वतीन आवाहन करण्यात येते की खरीप हंगामातील जवळपास दहा प्रकारचे पिके पिक विमा योजनेअंतर्गत संरक्षित केलेले आहेत यात तूर, मूग, उडीद, सोयाबीन, कापूस यासारख्या पिकांचा समावेश करण्यात आलेला आहे. या पिकांचा विमा उतरवणे गरजेचे आहे.

३१ जुलै पूर्वी जवळच्या सीएससी सेंटर राष्ट्रीयकृत बँक या ठिकाणी पिक विमा भरता येईल यामध्ये काही तांत्रिक अडचण आल्यास गाव पातळीवर कृषी सहाय्यक, तालुका कृषी अधिकारी, विमा कंपनीचे प्रतिनिधी यांच्याशी संपर्क साधावा ३१ जुलै या शेवटच्या तारखेची वाट न बघता लवकरात लवकर पिक विमा योजनेची फॉर्म भरा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्या वतीने करण्यात आले.




आहिल्यानगरमध्ये सीबीएसई शाळांची यशस्वी एस.टी.ई.एम. बाबत चर्चासत्रामध्ये सहभागी झालेले तज्ज्ञ.

# अहिल्यानगरमध्ये सीबीएसई शाळांची यशस्वी एस.टी.ई.एम. बाबत चर्चासत्र

नगर – सीबीएसई शाळांच्या आहिल्यानगर सहोदय स्कूल कॉम्प्लेक्सतर्फे एस.टी.ई.एम. शिक्षणावर आधारित जिल्हास्तरीय विचार विनिमय कार्यशाळा नुकतीच आर्मी पब्लिक स्कूल येथे पार पडली. चर्चासत्रात नगरमधील विविध सी.बी.एस.ई. शाळांमधून ४५ हून अधिक एस.टी.ई.एम. एज्युकेटर्स सहभागी झाले होते. एस.टी.ई.एम. शिक्षणातील नवीन कल्पना, चांगले प्रॅक्टिसेस एकमेकांना सांगणे व आव्हानांवर विचारमंथन करणे या उपक्रमाचा उद्देश होता. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी सहोदयच्या संस्थापक आराधना राणा, अध्यक्ष दीपिका नगरवाला, सचिव नम्रता ओहरी, खजिनदार नूतन मिश्रा आणि एस.टी.ई.एम. तज्ज्ञ हेमंत केदारे, संदीप समलेती आदी उपस्थित होते.

यावेळी आर्मी पब्लिक स्कूल, अहिल्यानगर, आर्मी पब्लिक स्कूल, एम.आय.सी.एस., तक्षशिला स्कूल, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील स्कूल, पोदार इंटरनॅशनल, द आयकॉन पब्लिक स्कूल, नालंदा आणि इतर शाळांनी आपल्या एस.टी.ई.एम. मध्ये घेतलेल्या उत्कृष्ट उपक्रम, नाविन्यपूर्ण प्रकल्प, अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीतील येणाऱ्या अडचणींवर चर्चा करण्यात आली.

दीपिका नगरवाला यांनी शिक्षकांनी अशा सहकार्याच्या व्यासपीठावर सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.

नूतन मिश्रा यांनी बहुविषयक दृष्टीकोन स्वीकारून शिक्षकांनी विषयाच्या पलिकडे जाण्याचे महत्त्व सांगितले.

भविष्यात इंटर-स्कूल संवाद, हॅण्ड्स-ऑन वर्कशॉप्स आणि रिसोर्स-शेअरिंग प्लॅटफॉर्म्स आयोजित करण्याची उत्सुकता शिक्षकांनी व्यक्त केली.

# जिल्ह्यातून पाच शेतकऱ्यांना मिळणार परदेश अभ्यास दौऱ्याची संधी

## ३० जुलैपर्यंत अर्ज सादर करावा

नगर – राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान व सुधारित शेती पद्धतींचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी परदेश अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी जिल्ह्यातून पाच शेतकरी निवडले जाणार असून, त्यात १ महिला शेतकरी, १ पुरस्कार प्राप्त शेतकरी व ३ इतर शेतकऱ्यांचा समावेश असेल. इच्छुकांनी ३० जुलैपर्यंत तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

दौऱ्यासाठी अर्ज करताना उमेदवाराचे वय किमान २५ वर्षे असावे. तो स्वतःच्या नावे जमीनधारक असावा. उत्पन्नाचे प्रमुख साधन शेतीच असावे, याची स्वयंघोषणा द्यावी. तसेच चालू सहा महिन्यांचा ७/१२ उतारा, आधारकार्ड, रेशनकार्ड, डॉक्टरकडून दिलेले शारीरिक तंदुरुस्ती प्रमाणपत्र व वैध पासपोर्टची प्रत अर्जासोबत जोडावी. यापूर्वी शासनाच्या मदतीने परदेश दौरा केलेला नसावा, तसेच उमेदवार कोणत्याही नोकरीत किंवा वैद्यकीय, विधी, अभियांत्रिकी अशा व्यवसायात नसावा. कुटुंबातील केवळ एका व्यक्तीलाच योजनेचा लाभ मिळणार आहे. निवडीनंतर वैद्यकीय तपासणी व कोरोना अहवाल देणे बंधनकारक राहील. माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# लोकसहभागी वेस्ट टू वेल्थ ही संकल्पना संपूर्ण अहिल्यानगर शहरात राबविणार

## आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन, सीएसआरडी महाविद्यालयात घन आणि द्रव संसाधन व्यवस्थापन कार्यशाळा

नगर – अहिल्यानगर शहरातील स्वच्छ भारत अभियानांतर्गत अनेक उपक्रम राबवले जात आहेत, यापुढे लोकसहभागी नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेणे काळाची गरज असून वेस्ट टू वेल्थ ही संकल्पना शहरात राबविणार असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.



घन व द्रव संसाधन व्यवस्थापन या विषयावरील आयोजित कार्यशाळेत महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे आदी.

अहिल्यानगर येथील भा. पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था व राष्ट्रीय सेवा योजना, अहिल्यानगर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने घन व द्रव संसाधन व्यवस्थापन या विषयावरील आयोजित कार्यशाळेत आयुक्त डांगे मार्गदर्शन करत होते. या कार्यशाळेत तामिळनाडूतील पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्ते व इंडिया ग्रीन सर्व्हिसचे प्रकल्प संचालक सी. श्रीनिवासन यांच्या वेल्लोर मॉडेल या नाविन्यपूर्ण आणि संपूर्ण लोकसहभागावर आधारित कचरा व्यवस्थापन प्रणालीची माहिती देण्यात आली. या मॉडेलद्वारे तामिळनाडूमधील अनेक गावांनी शून्य कचरा गाव म्हणून ओळख निर्माण केली आहे.

पुढे डांगे असे म्हणाले कि, प्लास्टिकमुक्त मोहिम व सांडपाणी व्यवस्थापनाचे प्रकल्प प्रामुख्याने लोक केंद्रित असणे गरजेचे आहे, श्रीनिवासन यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे महानगरपालिकेला भविष्यात झिरो वेस्ट सिटी करण्याचा आपला प्रयत्न असेल. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे सशक्त नेटवर्क उभे राहिले, तर श्रीनिवासन यांची वेस्ट टू वेल्थ ही संकल्पना वास्तवात उतरू शकते असा आशावाद व्यक्त केला.

यावेळी इंडिया ग्रीन सर्व्हिसचे प्रकल्प संचालक सी. श्रीनिवासन, सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. गणेश निमसे, मिशन पीस मेकिंगचे अनुप हिवाळे, अहिल्यानगर महानगरपालिका घन कचरा विभाग प्रमुख अशोक साबळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यशाळेत विविध महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, स्वच्छता विभागाचे अधिकारी कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी व विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी कार्यशाळेदरम्यान स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविल्याबद्दल अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांचा श्रीनिवासन यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

श्रीनिवासन यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले कि, कचरा ही समस्या नाही, तर एक न संपणारे संसाधन आहे. जर त्याकडे लोकसहभागी, नवोपक्रमाच्या दृष्टिकोनातून पाहिले, तर त्याचे प्रभावी व्यवस्थापन सहज शक्य आहे, कचऱ्याचे वर्गीकरण हे त्याच्या स्त्रोतावरच होणे गरजेचे आहे. जैविक कचऱ्यापासून कंपोस्ट, बायोगॅस तर अजैविक कचऱ्याचा पुनर्वापर, पुनर्प्रक्रिया आणि उपयुक्त उत्पादने तयार करणे शक्य आहे. मासळी कचरा खाण्यासाठी बदकांचा उपयोग, स्थानिक मजुरांचा रोजगारात समावेश आणि बायोडायजेस्टरसारख्या उपायांमुळे संपूर्ण परिसंस्थेचे पुनर्स्थापन शक्य होते.

डॉ. पठारे यांनी सांगितले कि, कचरा व्यवस्थापनातील सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असून स्वच्छता अभियान अधिक लोककेंद्रित करण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले, शाश्वत विकास ध्येय संदर्भातील उपक्रम आणि पर्यावरण संवेदनशील शैक्षणिक संस्थांची जबाबदारी यावर त्यांनी प्रकाश टाकला. प्रमुख पाहुण्याची ओळख राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप जारे यांनी करून दिली. एमएसडब्ल्यू समन्वयक डॉ.विजय संसारे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन सॅम्युअल वाघमारे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेत कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी आपले योगदान दिले.

